




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक २८८ * नांदेड * गुरूवार, दि. २९ ऑक्टोबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# महाविकास आघाडीचा तीन जागांवर तर महायुतीचा दोन जागांवर विजय

## राज्यातील पाच विधान परिषदेच्या निवडणुकीचा निकाल जाहीर

**मुंबई (प्रतिनिधी)–** विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांतील पाच जागांच्या निवडणुकीत महाविकास आघाडी तीन जागा जिंकत वर्चस्व मिळवले, तर महायुतीला दोन जागांवर समाधान मानावे लागले. पुणे शिक्षक मतदारसंघात भाजपने विजय मिळवला. तर, अमरावती शिक्षक मतदारसंघात शिवसेनेने बाजी मारली. नागपूर पदवीधर मतदारसंघात काँग्रेसने मोठी बाजी मारली असून पुणे शिक्षक आणि छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघाची जागा शरद पवार गटाने जिंकली.


हर्षदा देशमुख


अभिजीत वंजारी


कौस्तुभ गावडे


किरण सरनाईक

पुणे शिक्षक मतदारसंघात भाजपचे कौस्तुभ गावडे विजयी झाले. त्यांच्याविरोधात शिंदे यांच्या शिवसेनेचे पुरस्कृत अपक्ष उमेदवार सचिन सानप आणि काँग्रेसचे जयंत आसगावकर मैदानात होते.

अमरावती शिक्षक मतदारसंघात शिवसेनेचे किरण सरनाईक यांनी विजय मिळवला. काँग्रेसच्या अदिती पोहरे, अपक्ष संगीता शिंदे आणि उबाठाचे दत्तात्रय लहाने यांच्याशी त्यांची लढत झाली. या विजयामुळे महायुतीच्या खात्यात शिवसेनेची एक जागा जमा झाली. दुसरीकडे, पुणे पदवीधर मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरदचंद्र पवार पक्षाच्या हर्षदा देशमुख–जाधव यांनी विजय मिळवला. छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघातही याच पक्षाचे प्रतापसिंह पाटील विजयी झाले. त्यामुळे महाविकास आघाडीला मिळालेल्या दोन जागांमध्ये शरद पवार गटाचा वाटा राहिला.

### शेवटच्या क्षणी काँग्रेसचे अभिजीत वंजारी विजयी

नागपूर पदवीधर मतदारसंघात काँग्रेसचे अभिजीत वंजारी यांनी विजय शेवटच्या क्षणी विजय मिळवला आहे. या मतदारसंघात भाजपचे सुधाकर कोहळे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरदचंद्र पवार पक्षाचे नितेश कराळे आणि शिक्षक भारतीचे अतुल देशमुख यांच्याशी त्यांची लढत झाली.

या निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्ही बाजूंतील बंडखोरीमुळे राजकीय चुरस निर्माण झाली होती. सुमारे ३० तास चाललेल्या मतमोजणीनंतर पाचही जागांचे निकाल स्पष्ट झाले.

# मराठवाडा पदवीधर मतदारसंघात शरद पवार गटाचे प्रतापसिंह पाटील विजयी

## तीनवेळा आमदार राहिलेल्या सतीश चव्हाण यांचा पराभव

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)–** राज्यातील पाच विधानपरिषद निवडणुकांचा निकाल जाहीर झाला असून महाविकास आघाडीला तीन जागांवर विजय मिळाला, तर महायुतीने दोन जागा जिंकल्या आहेत. मात्र, येथील निवडणुकीत मराठवाडा पदवीधर मतदारसंघात धक्कादायक निकाल पाहायला मिळाला. मराठवाडा पदवीधर मतदारसंघात सलग तीनवेळा विजय मिळवणारे राष्ट्रवादी महायुतीचे उमेदवार सतीश चव्हाण यांना यंदाच्या निवडणुकीत मोठा राजकीय धक्का बसला. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी विजय मिळविला आहे.



केवळ १२ दिवसांच्या प्रचारावर राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे उमेदवार डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी सलग तीन वेळा निवडून येणाऱ्या सतीश चव्हाण यांच्या विरोधात विजय मिळविला आहे. पहिल्या पसंतीच्या मतमोजणीनंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) पक्षाचे उमेदवार डॉ. प्रतापसिंह पाटील यांना ७३,९३१, सतीश भानुदासराव चव्हाण यांना ६०,७६८, तर रविराज साबळे पाटील यांना १९,८३५ मते मिळाली होती.

तिसऱ्या फेरीअखेर पहिल्या पसंतीचे १,९३,६५५ मतपत्रिकांची मोजणी झाली. त्यापैकी १,७७,११५ मते वैध, तर १६,५४० मतपत्रिका हस्तांतरणास अपात्र ठरल्या आहेत. विजयासाठी आवश्यक मतांचा कोटा ८८,५५८ निश्चित झाला. विद्यमान आमदार सतीश चव्हाण पहिल्या दोन्ही फेरीमध्ये मागे पडले. पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीमध्ये एक लाख ९१ हजार ६८९ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. हे शेकडा प्रमाण ६२.५३ टक्के होते.

विधान परिषदेच्या निवडणुकीमध्ये भाजपचा उमेदवार असावाच असा सातत्याने आग्रही असणाऱ्या भाजपने हा मतदारसंघ राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार) पक्षास सोडला. महायुतीचा उमेदवार म्हणून सलग तीन वेळा निवडून आलेल्या चव्हाण यांना उमेदवारी देण्यात आली. तालुका पातळीपर्यंत संपर्क आणि संस्थात्मक पातळीवर नोंदणी करण्याची क्षमता या जोरावर निवडणूक जिंकता येईल, असा दावा सतीश चव्हाण यांच्या समर्थकांचा होता.

# फुले मार्केटचे फुटपाथ झाले पार्किंग लॉट! किसान, चेन्नई, रिलायन्स मॉलसमोर वाहतूक कोंडी

## कारवाईची मागणी, सामाजिक कार्यकर्त्यांचे वाहतूक पोलिसांना निवेदन

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या मध्यवर्ती भाग असलेल्या फुले मार्केट परिसरातील फुटपाथ आता पादचाऱ्यांसाठी न राहता मॉलच्या ग्राहकांसाठी बेकायदेशीर पार्किंगचे ठिकाण बनले आहे. यामुळे पादचाऱ्यांचे आणि वाहनधारकांचे मोठे हाल होत असून मॉल चालक व वाहनधारकांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी होत आहे.

शहरातील फुले मार्केटच्या मुख्य रस्त्यावरील किसान फॅशन मॉल, चेन्नई फॅशन मॉल, आर. एस. ब्रदर्स मॉल आणि रिलायन्स मॉल या मोठ्या मॉल्सकडे ग्राहकांसाठी स्वतःची अधिकृत पार्किंग व्यवस्था नाही. दसरा–दिवाळीच्या खरेदीच्या मुहूर्तावर येणारे ग्राहक आपल्या दुचाकी व चारचाकी वाहने थेट फुटपाथवर लावतात. फुपाथ हा चालण्याचा हक्क आहे, गाड्या लावण्याचा नाही. फुटपाथवर वाहने असल्याने ज्येष्ठ नागरिक, महिला, शाळकरी मुलांना जीव धोक्यात घालून मुख्य रस्त्यावरून चालावे लागते. सायंकाळी ४ ते १० वाजेच्या दरम्यान आयटीआय ते फुले मार्केट या संपूर्ण पट्ट्यात फुटपाथवरील वाहनांमुळे अर्धा ते एक तास वाहतूक जाम होत आहे. रुग्णवाहिका, विद्यार्थी आणि नोकरदार वर्गाला याचा सर्वाधिक फटका बसतो. मोटार वाहन कायदा १९८८, कलम १२२ अन्वये सार्वजनिक ठिकाणी अडथळा निर्माण होईल अशा प्रकारे वाहन ठेवणे हा गुन्हा आहे. कलम १७७ अन्वये अशा वाहनांवर दंडाची तरतूद आहे. कलम २०१ अन्वये अडथळा करणारी वाहने टोईंग करून उचलण्याचा (पान ५ वर...)

# दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर ग्रामसेवकांना मुख्यालयी थांबणे बंधनकारक

## विनापरवानगी मुख्यालय सोडल्यास शिस्तभंगाची कारवाई; सीईओ महेश पाटील यांचे निर्देश

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पाणीटंचाई, जनावरांसाठी चारा, रोजगार हमी योजनेची कामे आणि इतर टंचाई निवारणाच्या उपाययोजनांना गती देण्यासाठी ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना (ग्रामसेवकांना) मुख्यालयी उपस्थित राहणे बंधनकारक करण्यात आले आहे. विनापरवानगी मुख्यालय सोडणाऱ्या किंवा कर्तव्यात कसूर करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असा इशारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी दिला आहे.

ग्रामविकास विभागाच्या मुख्य सचिवांच्या १६ ऑक्टोबर रोजी झालेल्या बैठकीतील सूचनांनुसार हे निर्देश देण्यात आले आहेत. दुष्काळी परिस्थितीत ग्रामस्थांना तातडीने मदत मिळावी आणि टंचाई निवारणाची कामे प्रभावीपणे राबविता यावीत, यासाठी ग्रामपंचायत स्तरावर सक्षम यंत्रणा कार्यरत ठेवण्यावर भर देण्यात आला आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा गटविकास अधिकारी यांच्या पूर्वपरवानगीशिवाय ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना मुख्यालय सोडता येणार नाही.

एकापेक्षा अधिक ग्रामपंचायतींचा कार्यभार असलेल्या ग्रामसेवकांच्या भेटीचे वार आणि वेळ गटविकास अधिकाऱ्यांमार्फत निश्चित करण्यात येणार आहेत. संबंधित ग्रामपंचायत कार्यालयाच्या दर्शनी भागात भेटीचे वेळापत्रक आणि अधिकाऱ्यांचा मोबाईल क्रमांक असलेला माहिती फलक लावणे बंधनकारक राहणार आहे. या वेळापत्रकाची प्रत सरपंच, पंचायत समिती कार्यालय आणि तहसील कार्यालयातील टंचाई कक्षाला देण्यात येणार आहे.

ग्रामपंचायतीला भेट देताना अधिकाऱ्यांनी पाणीटंचाईची स्थिती, टँकरने पाणीपुरवठा करण्याची गरज, विहीर अधिग्रहणाचे प्रस्ताव, पिण्याच्या पाण्याचे स्रोत, रोजगार हमी योजनेतील कामांची मागणी, जनावरांसाठी चाऱ्याची उपलब्धता तसेच ग्रामस्थांच्या अडचणींचा आढावा (पान ५ वर...)

# मी प्रस्थापित गिळलाय –रविराज साबळे

**मुंबई (प्रतिनिधी)–** मराठवाडा पदवीधर मतदारसंघात यंदाच्या निवडणुकीत सर्वाधिक चर्चा ठरली ती शेतकरीपुत्र आणि रिलस्टार रविराज पाटील यांची. रविराज पाटील यांनी तिसऱ्या फेरीअखेर तब्बल पहिल्या पसंतीची २० हजार ४५० मतं घेतली आहेत.

यंदाच्या विधानपरिषद शिक्षक आणि पदवीधर निवडणुकीत दोन चेहरे चांगलेच चर्चेत ठरले आहेत. त्यामध्ये, शेतकरी पुत्र म्हणून शेतीच्या प्रश्नावर आक्रमक असलेले रिलस्टार रविराज साबळे पाटील आणि दुसरे म्हणजे विदर्भातील मास्तर कराळे गुरुजी. हे दोन्हीही चेहरे सोशल मीडियावर चांगलेच प्रसिद्ध असून त्यांचे फॉलोअर्सही लाखोंमध्ये आहेत. मात्र, विधानपरिषद निवडणुकीत यांना काही हजार मतं मिळाली असली तर प्रस्थापित उमेदवारांना धक्का देणारी कामगिरी त्यांनी बजावलीय. रविराज साबळे यांच्या उमेदवारीमुळे मराठवाडा पदवीधर मतदारसंघात महायुतीचे सतीश चव्हाण यांना पराभवाचा सामना करावा लागला. कारण, मी प्रस्थापित गिळलाय, अशी प्रतिक्रिया रविराज साबळे यांनी या निवडणुकीच्या निकालानंतर दिली.

# माळकौठा शेतकरी मृत्यू प्रकरणात मुख्य आरोपीसह तिघांना अटक; एलसीबीची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील वजिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हिंगोली गेट ब्रिजजवळील 'केएफ इंटरप्रायझेस' या फायनान्स कंपनीच्या कार्यालयात शेतकरी चंद्रकांत दगडूजी शिंदे (वय ४०, रा. माळकौठा, ता. मुदखेड) यांचा मृतदेह आढळून आला होता. या गंभीर घटनेच्या तपासासाठी पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांनी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन केल्यानंतर डीवायएसपी व्यंजने यांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकामार्फत यातील मुख्य आरोपी हरप्रीतसिंघ उर्फ मंटू, सतपालसिंघ खालसा व शेख साहेब मेहमुद (वय २१) रा. परभणी या तिघांना अटक केली आहे. या दोन्ही आरोपींना गुरुवार, दि. २९ ऑक्टोबर रोजी न्यायालयासमोर हजर करण्यात येणार असल्याचे व्यंजने यांनी सांगितले.

मृत शेतकऱ्याची पत्नी ज्योती चंद्रकांत शिंदे (वय ३७) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. २२ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी माळकौठा तालुका मुदखेड गावातील मारोती मंदिराजवळून दोन अनोळखी व्यक्तींनी चंद्रकांत शिंदे यांना जबरदस्तीने दुचाकीवर बसवून नांदेड येथील केएफ इंटरप्रायझेसच्या कार्यालयात आणले होते. तेथे दोन दिवस डांबून ठेवून त्यांना मारहाण करून त्याची हत्या करण्यात आल्याचा आरोप आहे.

या तक्रारीवरून वजिराबाद पोलीस ठाण्यात गु.र.नं. ५३३/२०२६ कलम १०३(१), १४०(१), १४०(२), १४२, १२७(२) आणि ३(५) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखा आणि वजिराबाद पोलिसांनी तातडीने कारवाई करत ४ जणांना अटक केली होती. त्यात जयकुमार उर्फ भैय्या भगवान गायकवाड (वय २२, रा. सिडको, नांदेड), शेख आमेर शेख साहेबहुसेन (वय २५, रा. देगलूर नाका, नांदेड), इम्रान खान शाहेबाज खान (वय ४०, रा. गोवर्धन घाट, नांदेड) – या तिघांना दि. २५ ऑक्टोबर रोजी तर शेख मुदशीर शेख खदीर (वय २४, रा. पिरबुऱ्हाणनगर, नांदेड) यास दि. २६ ऑक्टोबर रोजी अटक करून न्यायालयात हजर केले. या चारही आरोपींची पोलीस कोठडी २९ ऑक्टोबर रोजी संपणार आहे. यातील मुख्य व फरार झालेला आरोपी केएफ फायनान्स आणि कुबेर फल पतसंस्थेचे अध्यक्ष हरप्रीतसिंग नरेंद्रसिंघ मेजर (उर्फ मंटू), सचिव सतपालसिंघ किशनसिंघ खालसा (केरोसीनवाले) व शेख साहेब मेहमुद (वय २१) रा. परभणी या तिघांना व्यंजने यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे येथे गेलेल्या पथकाने अटक केली. या प्रकरणात अजून काही आरोपी अटक करण्यात येणार असल्याचे व्यंजने यांनी सांगितले.




**नांदेड :** विधानपरिषद मराठवाडा पदवीधर मतदारसंघातून महाविकास आघाडी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील हे प्रचंड मताधिक्याने विजयी झाल्यानिमित्त आयटीआय कॉर्नर महात्मा ज्योतिबा व सावित्रीबाई फुले स्मारकासमोर महाविकास आघाडीच्यावतीने फटाके फोडत मिठाई वाटप करून जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे व काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. (छाया : सचिन डोंगळीकर)






# ब्राह्मणवाड्यात वाळू माफियांवर उमाप यांच्या पथकाचा हातोडा; २८ लाखांचा मुद्देमाल जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यात अवैध वाळू उत्खनन आणि वाहतुकीविरोधात पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या विशेष पथकाने मोठी कारवाई केली आहे. विमानतळ पोलीस ठाणे हद्दीतील ब्राह्मणवाडा शिवारात छापा टाकून पथकाने २८ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दि. २७ ऑक्टोबर रोजी ब्राह्मणवाडा ते पाथरड रोडलगत अवैधरित्या वाळू साठवणूक केल्याची गोपनीय माहिती डीआयजी पथकाला मिळाली होती. पथकाने तात्काळ छापा टाकला असता, गोदावरी नदीपात्रातून वाळूचा उपसा करून मोठा साठा केल्याचे निदर्शनास आले. ही वाळू पोकलेनच्या सहाय्याने वाहनात भरली जात होती.

या कारवाईत पथकाने एक पोकलेन मशीन, एक टिप्पर आणि नदीपात्रातून काढून साठवलेली सुमारे ६० ब्रास वाळू असा एकूण २८ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या प्रकरणात २ जणांविरुद्ध विमानतळ पोलीस ठाण्यात गु.र.नं. ५३८/२०२६ कलम ३०३(२), ३(५) भारतीय न्याय संहिता सह कलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे, हवालदार प्रदीप खानसोळे, गणेश राठोड, संदीप वाघाडे आणि गजानन डवरे यांनी केली. त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल डीआयजी शहाजी उमाप यांनी पथकाचे अभिनंदन केले आहे.

# गुरुद्वारा बोर्ड पूर्ववत करण्याची अधिसूचना

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड सिख गुरुद्वारा सचखंड श्री हजूर अबचलनगर साहिब बोर्ड पुन्हा मूळ स्थितीत पुनर्स्थापित करण्याची अधिसूचना राज्य सरकारकडून काढण्यात आली आहे. याबाबत महाराष्ट्र शासनाने अधिकृत राजपत्र अधिसूचना जारी केली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने मुंबई उच्च न्यायालय (छत्रपती संभाजीनगर खंडपीठ) यांच्या निर्देशांचे पालन करत हा निर्णय घेतला आहे. याबाबत दि. २६ ऑक्टोबर २०२६ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्र (असाधारण भाग चार–अ) मध्ये अधिकृत अधिसूचना प्रकाशित करण्यात आली आहे.



महाराष्ट्र शासनाने नांदेड सिख गुरुद्वारा सचखंड अधिनियम १९५६ चे कलम ६ ची उपकलम (४) व (५) आणि कलम ११ ची उपकलम (१) अंतर्गत दि. ८ मार्च २०१९ च्या अधिसूचनेनुसार गुरुद्वारा बोर्डाचे गठन केले होते व अध्यक्षांची नियुक्तीही केली होती. मात्र, सन २०२२ च्या कारवाईनंतर राज्य शासनाने दि. २९ जून २०२२ ची अधिसूचना (क्र. जीयुआर/२०२२/सी.आर. १०८/जे-७ (ए)) अंतर्गत कलम ५३ (१) आणि (२) च्या अधिकारान्वये हा बोर्ड बरखास्त केला होता. त्यानंतर वेळोवेळी गुरुद्वारा बोर्डाचे कामकाज पाहण्यासाठी प्रशासकांची नियुक्ती करण्यात येत होती. या बरखास्तीच्या शासन निर्णयाला आव्हान देणाऱ्या रिट याचिकेवर (पान ५ वर...)

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# ट्रम्प यांच्या मध्यावधीची परीक्षा

अमेरिकेतील २०२६ ची मध्यावधी निवडणूक ही केवळ काँग्रेसच्या जागांसाठीची नियमित निवडणूक राहिलेली नाही; ती राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळाच्या दिशेचा महत्त्वाचा जनमत-संकेत ठरणार आहे. ३ नोव्हेंबरला होणाऱ्या या निवडणुकीत प्रतिनिधीगृहाच्या सर्व ४३५ जागा आणि सिनेटमधील सुमारे एकतृतीयांश जागा निवडल्या जाणार आहेत. मात्र येथे एक महत्त्वाची बाब स्पष्ट करणे आवश्यक आहे. ट्रम्प स्वतः या निवडणुकीत राष्ट्राध्यक्षपदासाठी उभे नाहीत. त्यामुळे ते 'जिंकतील की हरतील' असा थेट प्रश्न नसून, त्यांच्या नेतृत्त्वाखालील रिपब्लिकन पक्षाला काँग्रेसमध्ये नियंत्रण टिकवता येईल का, हा या निवडणुकीचा खरा अर्थ आहे. सध्याच्या राजकीय वातावरणात रिपब्लिकन पक्षासाठी परिस्थिती आव्हानात्मक दिसत आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे ट्रम्प यांच्या लोकप्रियतेतील घट. २१ सप्टेंबरच्या विविध सर्वेक्षणात ट्रम्प यांच्या कामगिरीला केवळ ३२ टक्के अमेरिकनांनी पसंती दिली, तर ५८ टक्के मतदारांनी नापसंती व्यक्त केली. काँग्रेससाठीच्या पसंतीत डेमोक्रॅट्सना रिपब्लिकनपेक्षा आठ टक्के गुणांची आघाडी दिसली. महागाई, जीवनावश्यक वस्तूंच्या किमती आणि इराणमधील युद्ध यांचा या असंतोषाशी संबंध असल्याचे सर्वेक्षणात दिसते. परंतु एवढ्यावरून डेमोक्रॅट्सचा विजय निश्चित मानणे चुकीचे ठरेल. अमेरिकेतील मध्यावधी निवडणुकीत राष्ट्रीय मतदानाच्या आकडेवारीपेक्षा राज्यनिहाय आणि मतदारसंघनिहाय स्पर्धा निर्णायक ठरते. रिपब्लिकन पक्षाकडे ट्रम्प यांचा मजबूत समर्थक वर्ग आहे. स्थलांतर आणि गुन्हेगारीसारख्या मुद्द्यांवर रिपब्लिकनना अद्याप आघाडी असल्याचे एका सर्वेक्षणाच्या आकडेवारीत दिसते. दुसरीकडे आरोग्य, शिक्षण आणि पर्यावरण या विषयांवर डेमोक्रॅट्सना तुलनेने अधिक समर्थन आहे. म्हणून सध्याच्या आकडेवारीवरून ट्रम्प यांचा 'पराभव होईल' असे ठाम भाकीत करण्याऐवजी, त्यांच्या पक्षाच्या काँग्रेसवरील नियंत्रणाला गंभीर आव्हान निर्माण झाले आहे, असे म्हणणे अधिक वस्तुनिष्ठ ठरेल. सध्याची सिनेटची लढत अत्यंत अनिश्चित असल्याचे दिसून येते. या निवडणुकीचा अमेरिकेच्या शासनव्यवस्थेवर मोठा परिणाम होऊ शकतो. रिपब्लिकन पक्षाने काँग्रेसवरील नियंत्रण गमावले, तर ट्रम्प प्रशासनाला आपल्या कार्यक्रमासाठी विरोधी पक्षाशी अधिक संघर्ष करावा लागू शकतो. त्याचबरोबर काँग्रेसच्या समित्यांकडून प्रशासनाच्या निर्णयांची चौकशी आणि देखरेख अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. उलट, रिपब्लिकन नियंत्रण कायम राहिल्यास ट्रम्प यांच्या आर्थिक, स्थलांतर आणि परराष्ट्र धोरणांना काँग्रेसकडून तुलनेने अधिक राजकीय पाठबळ मिळू शकते. यातील सर्वात गंभीर मुद्दा अर्थव्यवस्थेचा आहे. महागाई, पेट्रोल-डिझेलचे दर आणि कुटुंबांच्या खर्चावरील वाढता ताण हे मतदारांच्या दैनंदिन जीवनाशी थेट जोडलेले प्रश्न आहेत. शेअर बाजारातील तेजीपेक्षा किराणा, घरभाडे, इंधन आणि आरोग्यसेवेचा खर्च सामान्य मतदारासाठी अधिक महत्त्वाचा असतो. त्यामुळे ट्रम्प प्रशासनाच्या आर्थिक धोरणांची प्रतिमा या निवडणुकीत निर्णायक ठरू शकते. इराणमधील युद्धामुळे हा प्रश्न आणखी गुंतागुंतीचा झाला आहे. इंधनाच्या किमती वाढणे, संरक्षणखर्च आणि परराष्ट्र धोरणावरील मतभेद यांचा परिणाम देशांतर्गत राजकारणावर होतो आहे. काही रिपब्लिकन उमेदवारांनीही इराण युद्धाबाबत ट्रम्प यांच्यापेक्षा वेगळी भूमिका मांडण्यास सुरुवात केली आहे. अमेरिकेच्या लोकशाहीसाठीही ही निवडणूक महत्त्वाची आहे. वास्तविक पाहता ही लोकशाही नव्हेच. ही तर ट्रम्प यांची हुकुमशाही आहे. ते आपल्या अविवेकी आणि बिनभरोश्याच्या निर्णयाबाबत जगामध्ये खूप कुप्रसिद्ध झाले आहेत. त्यामुळे त्यांच्यावर आज कोणी विश्वास ठेवायला तयार नाही. संपूर्ण जगाला त्यांचा त्रास होतो आहे, पण लोकांचा नाईलाज आहे. याची जाणीव ट्रम्प यांना देखील आहे, म्हणूनच त्यांनी स्वतः रिपब्लिकन मतदारांना मध्यावधी निवडणुकीकडे त्यांच्या नेतृत्त्वावरील जनमत म्हणून पाहण्याचे आवाहन केले आहे. त्यामुळे निकाल काहीही असो, ३ नोव्हेंबरनंतर अमेरिकन राजकारणातील सत्तासंतुलन आणि ट्रम्प यांच्या उर्वरित कार्यकाळाची राजकीय दिशा निश्चितपणे बदलू शकते. आजच्या घडीला उपलब्ध सर्वेक्षणे रिपब्लिकन पक्षासाठी इशारे देत आहेत; पण निवडणूक अजून बाकी असल्याने ट्रम्प यांच्या राजकीय पराभवाचे भाकीत करणे घाईचे ठरेल. खरी कसोटी महागाई, युद्ध, स्थलांतर आणि मतदारांचा मतदानातील सहभाग या चार आघाड्यांवर होईल. मध्यावधीचा निकाल हा केवळ काँग्रेसची रचना बदलणार नाही, तर उर्वरित ट्रम्प कार्यकाळात अमेरिकेतील राष्ट्राध्यक्षीय सत्ता आणि काँग्रेस यांच्यातील संबंध किती सहकार्याचे किंवा संघर्षाचे राहतील, याचेही संकेत देईल. तसेच जनतेच्या मनामध्ये ट्रम्प यांच्याबाबत असलेल्या भावनांचे प्रतिबिंब देखील यात उमटणार आहे.

# दुष्काळ : नैसर्गिक व सामाजिक आव्हान



दुष्काळ ही केवळ पावसाच्या अभावामुळे निर्माण होणारी नैसर्गिक आपत्ती नसून मानवी जीवन, सामाजिक व्यवस्था, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि पर्यावरण यांची कसोटी पाहणारे गंभीर आव्हान आहे. महाराष्ट्राच्या संदर्भात दुष्काळाचा विचार करताना या समस्येचे स्वरूप अधिक व्यापक असल्याचे लक्षात येते. राज्यातील शेतीचा मोठा भाग पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे पावसाचे प्रमाण कमी झाले किंवा त्याचे वितरण अनियमित झाले, तर शेतकऱ्यांच्या उत्पन्नापासून ग्रामीण कुटुंबांच्या दैनंदिन जीवनापर्यंत अनेक बाबींवर परिणाम होतो. पिण्याच्या पाण्याची टंचाई, पिकांचे नुकसान, जनावरांसाठी चाऱ्याचा अभाव, शेतमजुरांना काम न मिळणे, कर्जाचा वाढता भार आणि रोजगारासाठी होणारे स्थलांतर या दुष्काळाच्या प्रमुख सामाजिक परिणामांपैकी काही आहेत. पाणी हे जीवनाचे मूलभूत साधन असल्यामुळे त्याच्या उपलब्धतेतील घट संपूर्ण समाजाच्या जगण्यावर परिणाम करते. निसर्गातील पावसाचे चक्र मानवी नियंत्रणात नसले, तरी पाण्याचे नियोजन, जलस्रोतांचे संवर्धन, शेतीतील बदल आणि सामाजिक सुरक्षेच्या उपाययोजनांच्या माध्यमातून दुष्काळाची तीव्रता कमी करता येते. म्हणूनच महाराष्ट्रातील दुष्काळाकडे केवळ नैसर्गिक संकट म्हणून न पाहता ते एक महत्त्वाचे सामाजिक, आर्थिक आणि विकासविषयक आव्हान म्हणून पाहणे आवश्यक आहे.

महाराष्ट्राची भौगोलिक रचना, पर्जन्यमानातील प्रादेशिक तफावत आणि शेतीचे स्वरूप यांमुळे राज्यातील विविध भागांना वेगवेगळ्या प्रकारच्या जलसंकटांचा सामना करावा लागतो. सह्याद्रीच्या पश्चिमेकडील कोकणात आणि घाटमाथ्यावरील काही भागांत तुलनेने अधिक पाऊस पडतो; परंतु सह्याद्रीच्या पूर्वेकडील पर्जन्यछायेच्या प्रदेशात पावसाचे प्रमाण कमी असते. मराठवाड्यातील अनेक भाग, पश्चिम महाराष्ट्रातील काही तालुके आणि विदर्भातील काही प्रदेश पावसाच्या अनिश्चिततेमुळे प्रभावित होतात. नाशिक जिल्ह्यातही पश्चिमेकडील डोंगराळ भाग आणि तुलनेने कमी पाऊस पडणारे पूर्वेकडील भाग यांच्यात पर्जन्यमानाची तफावत आढळते. त्यामुळे एकाच जिल्ह्यातील वेगवेगळ्या तालुक्यांना पाणीटंचाईचे वेगवेगळे स्वरूप अनुभवावे लागू शकते.

महाराष्ट्राने वेगवेगळ्या काळांत पावसाच्या अनिश्चिततेमुळे निर्माण झालेल्या गंभीर संकटांचा सामना केला आहे. विशेषतः १९७२ चा दुष्काळ महाराष्ट्राच्या सामाजिक आणि आर्थिक इतिहासातील एक महत्त्वाचा संदर्भ मानला जातो. त्या काळात ग्रामीण भागातील मोठ्या लोकसंख्येला अन्नधान्य, पाणी आणि रोजगाराच्या प्रश्नांना सामोरे जावे लागले. शेतीचे नुकसान झाल्याने शेतकरी आणि शेतमजुरांच्या उपजीविकेवर परिणाम झाला. रोजगार हमीच्या कामांद्वारे ग्रामीण भागातील गरजू लोकांना काम उपलब्ध करून देण्याची संकल्पना पुढे येण्यात त्या काळातील अनुभवांचा महत्त्वाचा वाटा होता. त्या काळाच्या तुलनेत आज सिंचनाच्या सुविधा, रस्ते, दळणवळण, हवामानविषयक माहिती आणि कृषितंत्रज्ञान यांत बदल झाले आहेत. तरीही दुष्काळाचे आव्हान संपलेले नाही.

महाराष्ट्राच्या कृषी अर्थव्यवस्थेवर दुष्काळाचा सर्वाधिक परिणाम होतो. राज्यातील मराठवाडा आणि पावसावर अवलंबून असलेल्या इतर भागांत ज्वारी, बाजरी, तूर, हरभरा, कापूस आणि सोयाबीन यांसारखी पिके घेतली जातात. पावसाचा खंड पडल्यास पेरणी उशिरा होते, दुबार पेरणीची वेळ येते किंवा उभ्या पिकांचे नुकसान होते. बियाणे, खते, कीटकनाशके आणि मशागतीसाठी केलेला खर्च वाया जाण्याची शक्यता निर्माण होते.

महाराष्ट्रातील ऊसशेती आणि पाण्याच्या वापराचा प्रश्न दुष्काळाच्या चर्चेत विशेष महत्त्वाचा ठरतो. राज्यातील अनेक भागांत ऊस हा साखर उद्योग आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार आहे. साखर कारखान्यांमुळे रोजगार, वाहतूक, शेतीपूरक व्यवसाय आणि स्थानिक आर्थिक व्यवहारांना चालना मिळते. मात्र, ऊस हे तुलनेने अधिक पाणी लागणारे पीक असल्यामुळे पाणीटंचाईग्रस्त भागांत त्याच्या लागवडीचे नियोजन अत्यंत काळजीपूर्वक करणे आवश्यक आहे. ज्या प्रदेशांत पाण्याची उपलब्धता मर्यादित आहे, तेथे भूजलसाठे आणि इतर जलस्रोत लक्षात न घेता पाण्याची मोठी गरज असलेल्या पिकांचा विस्तार केल्यास पाणीवापरावरील ताण वाढू शकतो. याचा अर्थ ऊसशेतीला सरसकट विरोध करणे असा नसून पीकपद्धती, पाण्याची उपलब्धता आणि स्थानिक पर्यावरण यांचा समतोल राखणे असा आहे.

दुष्काळ ही सामाजिक विषमता वाढविणारी परिस्थितीही ठरू शकते. आर्थिकदृष्ट्या सक्षम शेतकऱ्यांना विहिरी, सिंचनाची साधने, पाण्याची साठवणूक किंवा पर्यायी व्यवसाय यांचा आधार मिळू शकतो; परंतु लहान शेतकरी आणि भूमिहीन कुटुंबांकडे असे पर्याय मर्यादित असतात. पाणीटंचाई निर्माण झाल्यास गावातील सर्व वस्त्यांना समान प्रमाणात पाणी मिळतेच असे नाही. मुख्य वस्तीच्या तुलनेत दूरवर असलेल्या वस्त्यांपर्यंत पाणी पोहोचण्यास अडचणी येऊ शकतात. सामाजिकदृष्ट्या वंचित कुटुंबांना पाण्याच्या स्रोतांपर्यंत पोहोचताना अधिक अडथळे येण्याची शक्यता असते. त्यामुळे पाण्याचे वितरण केवळ उपलब्धतेवर आधारित न ठेवता सामाजिक न्यायाच्या तत्त्वावर आधारित असणे आवश्यक आहे.

दुष्काळाचा महिलांच्या जीवनावर विशेष परिणाम होतो. महाराष्ट्रातील अनेक ग्रामीण भागांत पिण्याचे पाणी आणण्याची जबाबदारी प्रामुख्याने महिलांवर असते. विहिरी किंवा पाण्याचे टँकर दूरवर असल्यास त्यांना पाणी मिळविण्यासाठी अधिक वेळ आणि श्रम खर्च करावे लागतात. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर परिणाम होतो आणि शिक्षण, रोजगार किंवा इतर विकासाच्या संधींसाठी उपलब्ध असलेला वेळ कमी होतो. कुटुंबाचे उत्पन्न घटल्यास घरखर्चाचे नियोजन, मुलांचे संगोपन आणि अन्नाची व्यवस्था करण्याचा अतिरिक्त भार महिलांवर पडतो.

दुष्काळाचा पशुधनावर आणि पर्यावरणावरही गंभीर परिणाम होतो. पाऊस कमी पडल्यास गवताची वाढ खुंटते, चाऱ्याचे उत्पादन घटते आणि जनावरांसाठी पाणी मिळविणे कठीण होते. चारा आणि पशुखाद्याच्या किमती वाढल्यामुळे पशुपालकांचा खर्च वाढतो. आर्थिक अडचणींमुळे काही शेतकऱ्यांना जनावरे विकावी लागतात. ग्रामीण अर्थव्यवस्थेत पशुधनाला आर्थिक आणि सामाजिक महत्त्व असल्यामुळे त्याचे नुकसान म्हणजे भविष्यातील उत्पन्नाचा आधार कमकुवत होणे होय. पर्यावरणाच्या दृष्टीने जंगलतोड, जमिनीची धूप, पाणलोट क्षेत्रांचे नुकसान आणि भूजलाचा अतिवापर यांमुळे पाणीटंचाईची तीव्रता वाढू शकते. पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याऐवजी वेगाने वाहून गेल्यास भूजल पुनर्भरण कमी होते.

दुष्काळाच्या काळात महाराष्ट्र शासन आणि स्थानिक प्रशासनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. पाणीटंचाईग्रस्त गावांची वेळेवर ओळख, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा, जनावरांसाठी चारा आणि रोजगार उपलब्ध करून देणे या तातडीच्या उपाययोजना आहेत. पात्र शेतकऱ्यांना नियमानुसार पीकविमा आणि नुकसानभरपाई मिळणे, ग्रामीण कुटुंबांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणे आणि गरजू व्यक्तींना अन्नसुरक्षेचा आधार मिळणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील रोजगार हमीविषयक योजना आणि विविध जलसंधारण कार्यक्रम ग्रामीण भागाला आधार देऊ शकतात. मात्र, योजनांचे यश त्यांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीवर अवलंबून असते. मदत वेळेवर मिळते का, पाणी गरजू वस्त्यांपर्यंत पोहोचते का, निधीचा योग्य वापर होतो का आणि केलेल्या कामांची गुणवत्ता टिकून राहते का, या बाबींची नियमित तपासणी आवश्यक आहे. ग्रामपंचायती, पंचायत समित्या, जिल्हा प्रशासन, कृषी विभाग आणि जलसंपदा विभाग यांच्यात समन्वय असणे गरजेचे आहे. संकटाच्या काळातील मदतीबरोबरच दुष्काळपूर्व तयारी, पाण्याचे अंदाजपत्रक आणि दीर्घकालीन जलनियोजन यांनाही समान महत्त्व दिले पाहिजे.

महाराष्ट्रातील दुष्काळाचे आव्हान पेलण्यासाठी तात्पुरत्या मदतीबरोबरच दीर्घकालीन आणि सर्वसमावेशक धोरणाची आवश्यकता आहे. पाण्याची उपलब्धता, शेतीचे स्वरूप, ग्रामीण रोजगार, सामाजिक विषमता आणि पर्यावरणसंवर्धन यांचा एकत्रित विचार केल्याशिवाय दुष्काळावर कायमस्वरूपी मात करता येणार नाही. पावसाचे प्रमाण आपल्या नियंत्रणात नसले, तरी पावसाच्या पाण्याचे संकलन, भूजलाचा विवेकपूर्ण वापर, योग्य पीकपद्धती, स्थानिक रोजगारनिर्मिती आणि संकटग्रस्तांना वेळेवर मदत या बाबी मानवी प्रयत्नांच्या कक्षेत येतात. शेतकरी, शेतमजूर, महिला, मुले, वृद्ध आणि दिव्यांग व्यक्ती यांच्या गरजांकडे लक्ष देणे ही दुष्काळ व्यवस्थापनातील सामाजिक जबाबदारी आहे. महाराष्ट्राच्या दुष्काळग्रस्त भागांना जलसुरक्षित बनविण्यासाठी निसर्गाशी समतोल राखणारी विकासदृष्टी, पारदर्शक प्रशासन, वैज्ञानिक नियोजन आणि लोकसहभाग यांची सांगड घालणे आवश्यक आहे. दुष्काळाला केवळ नैसर्गिक संकट न मानता सामाजिक परिवर्तनाची आणि शाश्वत विकासाची दिशा ठरविणारे आव्हान मानले, तर जलसंपन्न, सक्षम आणि सामाजिकदृष्ट्या न्याय्य महाराष्ट्राच्या निर्मितीकडे वाटचाल करता येईल.

**-डॉ. राजेंद्र बगाटे**
हिंगोली

# सत्ता बदलते, प्रश्न कायम!



लोकशाहीत सत्तेचे परिवर्तन ही स्वाभाविक प्रक्रिया आहे. निवडणुका येतात, प्रचाराचे वादळ उठते, आश्वासनांची बरसात होते आणि सत्तेच्या खुर्च्या बदलतात. मात्र, या सगळ्या राजकीय घडामोडींच्या पलीकडे सामान्य माणसाच्या आयुष्यात खरोखर किती परिवर्तन घडते, हा प्रश्न आजही अनुत्तरित आहे.

राजकारण हे समाजाच्या भविष्याची दिशा ठरविणारे प्रभावी माध्यम आहे. लोकांच्या अपेक्षा, आकांक्षा आणि समस्यांना न्याय देण्याची जबाबदारी राजकीय नेतृत्वावर असते. फरंतु आज राजकारणात विचारांपेक्षा व्यक्तिकेंद्रित निष्ठा, विकासापेक्षा सत्तास्पर्धा आणि जनहितापेक्षा राजकीय सोयीला अधिक महत्त्व मिळत असल्याचे चित्र अनेकदा दिसते.

एकेकाळी राजकीय विचारसरणी, सामाजिक बांधिलकी आणि जनतेच्या प्रश्नांसाठी संघर्ष ही नेतृत्वाची ओळख होती. आज पक्षनिष्ठा बदल-ताना, राजकीय भूमिका बदलताना आणि सत्तेच्या समीकरणांनुसार निर्णय घेताना सामान्य नागरिक संभ्रमात पडतो. कालपर्यंत एकमेकांवर टीका करणारे नेते आज एकाच व्यासपीठावर दिसतात. राजकीय समीकरणे बदलणे हा लोकशाहीचा भाग असला, तरी या बदलामागील तत्त्वनिष्ठा आणि जनहिताची भूमिका स्पष्ट असणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांच्या उत्पादनाला योग्य भाव, तरुणांना रोजगार, महिलांना सुरक्षितता, सामान्य नागरिकांना परवडणारे शिक्षण आणि आरोग्यसेवा या मूलभूत प्रश्नांची उत्तरे केवळ भाषणांतून मिळत नाहीत. त्यासाठी ठोस धोरणे, पारदर्शक प्रशासन आणि प्रामाणिक अंमलबजावणी आवश्यक असते.

राज्यात नुकत्याच विधान परिषदेच्या निवडणुका पार पडल्या. परिवर्तन घडले. सिंहासारखी कामे व्हावीत. निवडणुकीत आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडल्या; परंतु आतातरी बेरोजगार तरुणाच्या हाताला काम मिळते का? शेतकऱ्याच्या घरात आर्थिक स्थैर्य येते का? ग्रामीण भागातील शाळा आणि रुग्णालयांची परिस्थिती सुधारते का? सामान्य माणसाला न्याय मिळविण्यासाठी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात का? या प्रश्नांची उत्तरेच राजकीय यशाचे खरे मोजमाप ठरायला हवीत.

लोकशाहीत मतदार हा केवळ निवडणुकीपुरता महत्त्वाचा नसतो. तो सत्तेचा खरा मालक असतो. मतदान करून प्रतिनिधी निवडणे ही त्याची पहिली जबाबदारी; परंतु निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या कामाचा हिशेब मागणे ही त्याची पुढची आणि अधिक महत्त्वाची जबाबदारी आहे.

राजकीय नेतृत्वानेही सत्ता म्हणजे अधिकार नव्हे, तर जनतेने सोपविलेली जबाबदारी आहे, हे विसरता कामा नये. विरोधक म्हणजे शत्रू नव्हे, तर लोकशाहीतील वैचारिक प्रतिस्पर्धी आहेत. मतभेद असू शकतात; पण मनभेद आणि द्वेषाची राजकीय संस्कृती समाजाच्या एकतेला बाधा आणते.

आज देशाला केवळ लोकप्रिय नेत्यांची नव्हे, तर संवेदनशील, दूरदृष्टी असलेल्या आणि जनतेच्या प्रश्नांशी प्रामाणिकपणे जोडलेल्या नेतृत्वाची गरज आहे. राजकारणाने समाजाला विभागण्याऐवजी जोडले पाहिजे. सत्तेने माणसाचा आवाज दाबण्याऐवजी त्याला न्याय दिला पाहिजे. कारण लोकशाहीचे खरे सौंदर्य सत्तेच्या खुर्चीत नसते; ते सामान्य माणसाच्या चेहऱ्यावर उमटणाऱ्या समाधानात असते. सत्ता बदलणे ही राजकीय घटना असते, पण जनतेच्या जीवनात सकारात्मक बदल घडविणे हीच लोकशाहीची खरी कसोटी असते.

**-पंडित पवळे**
नांदेड

# वाहतूक कोंडीचा विळखा; नियोजनाचा अभाव कधी संपणार?

शहराच्या विकासाचे मोजमाप केवळ उंच इमारती, रुंद रस्ते आणि आकर्षक चौकांवरून होत नाही, तर नागरिकांचा प्रवास किती सुरक्षित, सुलभ आणि वेळेची बचत करणारा आहे, यावरूनही होते. मात्र, आज अनेक शहरांमध्ये वाहतूक कोंडी ही दैनंदिन जीवनातील गंभीर समस्या बनली आहे. काही किलोमीटरचे अंतर पार करण्यासाठी अर्धा तास खर्च करावा लागत असेल, तर ही परिस्थिती शहराच्या नियोजनातील त्रुटी स्पष्ट करणारी आहे. वेगाने विकसित होणाऱ्या शहरातही वाहतूक व्यवस्थेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. लोकसंख्या वाढ, वाहनांची वाढती संख्या, बाजारपेठांचा विस्तार आणि नागरीकरण यामुळे रस्त्यांवरील वाहतुकीचा ताण वाढत आहे.

शहरातील प्रमुख चौक, बसस्थानक परिसर आणि व्यापारी पेठांमध्ये सकाळी व सायंकाळी वाहनांच्या लांबच लांब रांगा दिसतात. दुचाकी, चारचाकी, रिक्षा आणि मालवाहू वाहनांच्या गर्दीतून मार्ग काढताना नागरिकांना मोठी कसरत करावी लागते. अशा वेळी वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक असलेले नियोजन आणि नियंत्रण कितपत प्रभावी आहे, हा प्रश्न उपस्थित होतो. वाहतूक कोंडीचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे बेशिस्त पार्किंग. दुकाने आणि व्यापारी संकुलांसमोर रस्त्याच्या कडेला वाहने उभी केल्याने वाहतुकीसाठी उपलब्ध जागा कमी होते. काही ठिकाणी अतिक्रमणे, हातगाड्या आणि अनधिकृत फलकांमुळेही रस्ते अरुंद होतात. परिणामी, वाहतुकीचा वेग मंदावतो आणि छोट्या कारणांमुळेही मोठी कोंडी निर्माण होते. या समस्येवर उपाय म्हणून केवळ दंडात्मक कारवाई करून चालणार नाही, तर नियोजनबद्ध पार्किंग व्यवस्था उपलब्ध करून देणेही आवश्यक आहे. शहरातील चौकांमध्ये सिग्नल बसवणे हा वाहतूक नियंत्रणाचा एक भाग आहे. मात्र, सिग्नल बसविल्यानंतर वाहतूक सुरळीत झाली का, वाहनांच्या रांगा कमी झाल्या का आणि नागरिकांना त्याचा प्रत्यक्ष फायदा झाला का, याचे मूल्यमापन होणे गरजेचे आहे.



प्रत्येक चौकातील वाहनांची संख्या, रस्त्यांची रुंदी आणि वाहतुकीची वेळ यांचा अभ्यास करून सिग्नलची वेळ निश्चित केली पाहिजे. केवळ यंत्रणा उभारणे म्हणजे समस्या सुटणे नव्हे; ती यंत्रणा योग्य पद्धतीने कार्यरत ठेवणे अधिक महत्त्वाचे आहे. वाहतूक कोंडीचा परिणाम नागरिकांच्या वेळेवर, इंधनाच्या वापरावर आणि आरोग्यावर होतो. वाहनांच्या रांगा लागल्यामुळे इंधनाचा अपव्यय होतो आणि धुरामुळे वायुप्रदूषण वाढते. विद्यार्थ्यांना शाळेत पोहोचण्यास उशीर होतो, नोकरदारांचे वेळापत्रक बिघडते आणि व्यापाऱ्यांच्या व्यवसायावरही परिणाम होतो. या समस्येवर कायम स्वरूपी उपाय शोधण्यासाठी नगरपालिका, वाहतूक पोलीस, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि व्यापारी संघटनांनी समन्वयाने काम केले पाहिजे.

वाहतुकीची शिस्त प्रत्येकाने पाळली, तर अनेक समस्या आपोआप कमी होऊ शकतात. शहराचा विकास नागरिकांच्या सोयीसाठी असतो. नागरिकांना रोज वाहतूककोंडीत अडकून वेळ, इंधन आणि मानसिक शांतता गमवावी लागत असेल, तर विकासाच्या नियोजनाचा फेरविचार करण्याची वेळ आली आहे. वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी तात्पुरत्या उपायांपेक्षा ठोस नियोजन, प्रभावी अंमलबजावणी आणि सातत्यपूर्ण देखरेख आवश्यक आहे. प्रशासनाने जबाबदारीने काम करावे आणि नागरिकांनी वाहतुकीचे नियम पाळावेत.

वाहतूक कोंडी ही शहराच्या विकासाची अपरिहार्य किंमत नाही. योग्य नियोजन, शिस्त आणि प्रशासनाची इच्छाशक्ती असेल, तर हा विळखा नक्कीच सैल होऊ शकतो. आता गरज आहे ती केवळ आश्वासनांची नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीची ! वाहतूक कोंडीसाठी केवळ प्रशासनाला दोष देऊन चालणार नाही. नागरिकांची बेशिस्तही या समस्येला तितकीच जबाबदार आहे. सिग्नल तोडणे, विरुद्ध दिशेने वाहन चालवणे, रस्त्याच्या कडेला अनधिकृत पार्किंग करणे, वाहनांच्या रांगा मोडून पुढे जाण्याचा प्रयत्न करणे आणि चौकातच वाहने थांबवणे, अशा प्रकारांमुळे वाहतुकीचा वेग मंदावतो. विशेषतः शाळा, महाविद्यालये, बाजारपेठा, रुग्णालये आणि रेल्वे स्थानकांच्या परिसरात अनधिकृत पार्किंगमुळे मोठी कोंडी निर्माण होते. काही वाहनचालकांना नियमांचे पालन करण्यापेक्षा स्वतःचा वेळ वाचवणे महत्त्वाचे वाटते. मात्र, अशा वर्तनामुळे अनेकांचा वेळ वाया जातो. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याबरोबरच नागरिकांमध्ये शिस्त आणि जबाबदारीची जाणीव निर्माण करणेही तितकेच आवश्यक आहे.

दीर्घकाळ कोंडीत अडकून राहिल्यामुळे नागरिकांच्या कामकाजावर परिणाम होतो, तर रुग्णवाहिका आणि अग्निशमन दलाच्या वाहनांनाही वेळेत मार्ग मिळण्यात अडचणी येऊ शकतात. आपत्कालीन परिस्थितीत काही मिनिटांचे महत्त्वही मोठे असते. अशा वेळी वाहतुकीतील अडथळे जीवघेणे ठरू शकतात. त्यामुळे वाहतूक व्यवस्थापन हा केवळ सोयीचा प्रश्न नसून सार्वजनिक आरोग्य आणि नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित विषय आहे. उपाययोजना केवळ कागदावर नकोत!

वाहतुकीच्या प्रमाणानुसार सिग्नलची वेळ नियंत्रित करणारी स्मार्ट यंत्रणा विकसित करावप्रमुख रस्ते, बाजारपेठा आणि चौकांमधील अनधिकृत पार्किंगला आळा घालावा. बससेवा सक्षम करून मेट्रो, रेल्वे आणि इतर वाहतूक साधनांमध्ये समन्वय साधावखोदकाम आणि दुरुस्तीची कामे समन्वयाने करून ती निर्धारित वेळेत पूर्ण करावीत.सुरक्षित पदपथ, सायकल मार्ग आणि रस्ता ओलांडण्यासाठी योग्य व्यवस्था निर्माण कराववाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करतानाच नागरिकांना वाहतूक शिस्तीचे महत्त्व पटवून द्यावे.

प्रशासनाने नियोजन करावे आणि सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, ही अपेक्षा रास्त आहे. मात्र, नागरिकांनीही आपली जबाबदारी ओळखली पाहिजे. वाहतूक नियमांचे पालन करणे, वाहन योग्य ठिकाणी पार्क करणे, अनावश्यक हॉर्न न वाजवणे, शक्य असेल तेव्हा सार्वजनिक वाहतुकीचा वापर करणे आणि इतर वाहनचालकांच्या हक्कांचा आदर करणे, या साध्या गोष्टींमधून मोठा बदल घडू शकतो. वाहतूक व्यवस्थेतील शिस्त ही केवळ दंडाच्या भीतीतून नव्हे, तर सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून निर्माण झाली पाहिजे. प्रश्न आजही तोच आहेवाहतूक कोंडीचा विळखा कधी संपणार आणि नियोजनबद्ध वाहतूक व्यवस्थेचे स्वप्न प्रत्यक्षात कधी उतरणार?

**-प्रा. संजय बडे**
दहेगाव, ता. वैजापूर,
जि. छत्रपती संभाजीनगर
मो. ७८८८२९७८५९

# ‘नावाडी’ हे एका व्यक्तीची आत्मकथा नसून समाजजीवनाचा दस्ताऐवज -डॉ. केशव देशमुख

## भारत दाढेल लिखित नावाडी पुस्तकाचे प्रकाशन



**नांदेड (प्रतिनिधी)–** नावाडी हे एका व्यक्तीची आत्मकथा नसून तो समाजजीवनाचे दर्शन घडविणारा एक महत्त्वपूर्ण दस्ताऐवज आहे, असे प्रतिपादन भाषा सल्लागार समितीचे सदस्य तथा ज्येष्ठ साहित्यिक डॉ. केशव सखाराम देशमुख यांनी केले. ते भारत दाढेल लिखित पांडुरंग वाघमारे यांच्या जीवनप्रवासावर आधारित ‘नावाडी’ या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात बोलत होते.

रविवारी सायंकाळी हॉटेल सूर्याप्राईड येथे या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा थाटात पार पडला. अध्यक्षस्थानी माजी आमदार अविनाश घाटे हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून मारोती कसाब, ॲड. सुरेंद्र घोडजकर, ॲड. एन. एम. रानवळकर, बालाजी नागेश्वर आणि केशव शेकापूरकर आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. निर्मल प्रकाशन व बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बिजूर यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

पुस्तकावर भाष्य करताना डॉ. केशव देशमुख म्हणाले, एका निरक्षर माणसाचा हा जीवनइतिहास अनेकांसाठी अत्यंत प्रेरणादायी ठरणारा आहे. या पुस्तकातील प्रत्येक प्रसंग वाचकाला अंतर्मुख करण्यास भाग पाडतो. यामध्ये आलेला अण्णा भाऊ साठे यांच्या सोबतचा प्रसंग वाचकांच्या विचारमंथनाला चालना देणारा आहे. अनेक प्रतिकूल परिस्थिती आणि कष्ट झेलत पांडुरंग वाघमारे नावाचे गुरुजी स्वतः च्या जीवनात अंधार असला तरी इतरांच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश लावण्यासाठी आयुष्यभर संघर्ष करत राहिले.

प्रा. डॉ. मारोती कसाब म्हणाले, फक्त १२० पानांच्या या छोट्या पुस्तकात लेखक भारत दाढेल यांनी तब्बल सव्वाशे वर्षांचा सखोल इतिहास समर्थपणे मांडला आहे. हा केवळ एका व्यक्तीचा प्रवास नसून तो संपूर्ण समाजाचा इतिहास आहे. समाजातील दुर्लक्षित घटकांना प्रकाशात आणून त्यांचा प्रेरणादायी इतिहास उपलब्ध करून देण्याचे मोठे काम भारत दाढेल यांनी केले आहे. माजी आमदार अविनाश घाटे यांनी पांडुरंग वाघमारे यांच्या आठवणींना उजाळा दिला. ते म्हणाले, पांडुरंग वाघमारे यांचे कार्य मी लहानपणापासून पाहत आलो आहे. त्यांनी गोरगरिबांच्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी खूप परिश्रम घेतले. त्यांनी कधीही स्वतःचा विचार केला नाही. त्यांचा निर्मल स्वभाव पाहूनच माझे वडील, तत्कालीन राज्यमंत्री मधुकरराव घाटे यांनी त्यांना त्यावेळी शिक्षण संस्था मंजूर करून दिली. त्यामुळे गोरगरिबांच्या मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे हा त्यांचा उद्देश पूर्णत्वास आला.

निर्मलकुमार सूर्यवंशी यांनी प्रास्ताविक तर सूत्रसंचालन डॉ. भगवान सूर्यवंशी यांनी केले. या सोहळ्याला नांदेडसह परिसरातील साहित्यप्रेमी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने शिवा कांबळे, उज्ज्वला पडलवार, डॉ. अजय गव्हाणे, प्रा. विलास वैद्य, पोलीस उपनिरीक्षक मुरली गायकवाड आदींचा समावेश होता. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. शरद वाघमारे, सोनू दरेगावकर, श्रीरत्न रानवळकर, आनंदा वाघमारे, बालाजी वाघमारे, वंदना कलवले, संतोष वाघमारे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# शेतकरी संघटनेच्या २२ व्या मदत कक्ष दिनात विविध प्रश्नांवर चर्चा

## बोधडी ग्रामपंचायत गैरव्यवहाराच्या चौकशीचा अहवाल सादर करण्याची मागणी



**किनवट (प्रतिनिधी)–** शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फोडून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शेतकरी संघटनेच्या वतीने मंगळवार, दि. २७ रोजी आयोजित २२ व्या मदत कक्ष दिनात विविध समस्यांवर आवाज उठविण्यात आला. बोधडी बुद्रुक ग्रामपंचायतीच्या कथित भ्रष्टाचाराच्या चौकशीचा अहवाल सादर करण्याची मागणी, तसेच रिठा येथील शेतरस्त्याचा प्रश्न यावेळी प्राधान्याने मांडण्यात आला.

बोधडी बुद्रुक ग्राम–पंचायतीतील कथित भ्रष्टाचाराच्या चौकशीबाबत आतापर्यंत झालेल्या कार्यवाहीची माहिती द्यावी आणि चौकशीचा अहवाल सादर करावा, अशी मागणी सहायक गटविकास अधिकाऱ्यांकडे करण्यात आली. प्रकरणाची पारदर्शक चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी भूमिका संघटनेने मांडली.

मौजे रिठा येथील शेतकऱ्यांनी मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेअंतर्गत शेतरस्ता तातडीने मंजूर करण्याची मागणी केली. शेतापर्यंत जाण्यासाठी रस्ता नसल्याने शेतीची कामे करताना अडचणी येत असल्याचे त्यांनी निवेदनातून स्पष्ट केले. याबाबत उपसरपंच मारुती सिनगारे यांच्याकडे निवेदन सादर करून संबंधित यंत्रणेने रस्त्याच्या मंजुरीसाठी तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी केली.

यावेळी पिराजी नागोराव बर्गे व देवराव लक्ष्मण बर्गे, गणपत तरंगे, सुदाम बर्गे, रेणुकाबाई बर्गे, नारायण बर्गे, शिवाजी बर्गे, दिगंबर झाडे, शेषराव बर्गे, यशवंतराव बर्गे, मारुती बर्गे, रवींद्र बर्गे, हरी बर्गे, विश्वंभर बर्गे, अर्जुन बर्गे, नामदेव लोखंडे, देवराव बर्वे, यादव बर्गे यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

शासकीय योजनांचा लाभ मिळविताना येणाऱ्या अडचणी, प्रलंबित तक्रारी आणि स्थानिक प्रश्न प्रशासनापर्यंत पोहोचविण्यासाठी मदत कक्षाच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत. संबंधित अधिकाऱ्यांनी तक्रारींची दखल घेऊन वेळेत निर्णय घ्यावेत, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

कार्यक्रमाला ज्येष्ठ नेते त्रिभुवनसिंह ठाकूर, शेतकरी संघटनेचे नांदेड जिल्हाध्यक्ष रमेश कदम पाटील, विठ्ठलराव दांडेगावकर, महिला आघाडीच्या शोभाताई कुमरे, शिवराज मुंडे, हुशेन्ना हाळदकर, विजयेंद्र कांबळे, मधुकर वाघमारे, गौतम वाघमारे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

# कमलबाई क्षीरसागर यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)–** महसूल नगर तरोडा (बु.) येथील ज्येष्ठ नागरिक श्रीमती कमलबाई दशरथ क्षीरसागर यांचे दीर्घ आजाराने नांदेड येथील एका खाजगी रुग्णालयात निधन झाले. मृत्यू समयी त्या ७६ वर्षांच्या होत्या.



गुरुवार, दि. २९ ऑक्टोबर रोजी दुपारी दोन वाजता गोवर्धनघाट शांतीधाम येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. श्रीमती कमलबाई क्षीरसागर यांचे पश्चात वरिष्ठ क्षयरोग पर्यवेक्षक विजय व दिलीप क्षीरसागर ही दोन मुले, तीन मुली, सुना, नातू, पणतू असा परिवार आहे.

# भीमाशंकरची वनसंपदा वाचवा; अन्यथा तीव्र आंदोलन –छावा प्रदेशाध्यक्ष पंजाबराव काळे पाटील

**नांदेड (प्रतिनिधी)–** भीमाशंकर परिसरात विकासाच्या नावाखाली शेकडो वर्षांपासून उभी असलेली वनसंपदा आणि हिरवाई नष्ट केली जात असल्याचा आरोप करत, ही वृक्षतोड तात्काळ थांबवावी, अशी मागणी अखिल भारतीय छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष पंजाबराव काळे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. या मागणीची दखल घेतली नाही तर लोकशाही आणि सनदशीर मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी निवेदनातून दिला.



भीमाशंकर परिसर धार्मिक, पर्यटन आणि पर्यावरणीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहे. अशा संवेदनशील परिसरातील अनेक वर्षांपासूनची वृक्षसंपदा केवळ विकासकामांसाठी नष्ट करणे योग्य नसल्याचे काळे पाटील यांनी म्हटले आहे.

संत तुकाराम महाराजांच्या वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे या अभंगाचा उल्लेख करत त्यांनी निसर्गाशी असलेले आपले सांस्कृतिक नाते अधोरेखित केले. आपल्या संतांनी शेकडो वर्षांपूर्वी वृक्ष आणि वनराईला आपले सोयरे मानले. मात्र आज विकासाच्या नावाखाली आपण त्याच निसर्गाच्या मुळावर उठलो आहोत, ही गंभीर बाब आहे, असे त्यांनी नमूद केले.

महाराष्ट्राला विकास नक्कीच हवा आहे; पण महाराष्ट्र भकास करून नव्हे. रस्ते, उद्योग, पर्यटन आणि आधुनिक सुविधा हव्यात; मात्र त्यासाठी शेकडो वर्षांची वनसंपदा बळी देणे हा विकास होऊ शकत नाही, अशी स्पष्ट भूमिका काळे पाटील यांनी मांडली.

# एफएफएस ॲपद्वारे नांदेड जिल्ह्यात ३,५५३ शेतकऱ्यांची ९२८ मे. टन खतासाठी नोंदणी

## खत खरेदीतील पारदर्शकतेसाठी डिजिटल सुविधेचा लाभ घ्या –जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** शेतकऱ्यांना आवश्यक खते सुलभतेने उपलब्ध व्हावीत, खत वितरण प्रक्रियेत पारदर्शकता वाढावी आणि खत खरेदीसाठी होणारी गर्दी टाळता यावी, यासाठी केंद्र शासनाने ‘फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल’ (एफएफएस) हे ॲप उपलब्ध करून दिले आहे. या सुविधेचा नांदेड जिल्ह्यातील शेतकरी लाभ घेत असून, आतापर्यंत ३ हजार ५५३ शेतकऱ्यांनी ९२८ मेट्रिक टन खतासाठी ऑनलाइन नोंदणी केली आहे. जिल्ह्यातील अधिकाधिक शेतकऱ्यांनी या सुविधेचा वापर करावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी द. रा. कळसाईत यांनी केले आहे.

केंद्र शासनाची ही डिजिटल प्रणाली महाराष्ट्रात २२ ऑक्टोबरपासून लागू झाली आहे. शेतकऱ्यांना मोबाईलमधील प्ले स्टोअरवरून एफएफएस ॲप डाउनलोड करून आपल्या परिसरातील खत विक्री केंद्रांवर उपलब्ध असलेली खते, त्यांचा साठा आदी माहिती घरबसल्या मिळविता येते. आवश्यक खताची ऑनलाइन नोंदणी केल्यानंतर संबंधित विक्रेत्याकडून खत खरेदी करणे अधिक सुलभ होते. त्यामुळे खत खरेदीसाठी दुकानांबाहेर रांगा लावण्याची गरज कमी होणार आहे.

एफएफएस प्रणालीमुळे खत विक्री प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यास मदत होणार आहे. खतांची छापील किमतीपेक्षा जास्त दराने विक्री करणे तसेच अनुदानित खतांसोबत इतर कृषी निविष्ठांची खरेदी करण्याची सक्ती करणे यांसारख्या प्रकारांना आळा घालण्यास या प्रणालीची मदत होईल. ऑनलाइन नोंदणीमुळे खत वितरण प्रक्रियेत पारदर्शकता वाढून शेतकऱ्यांना आवश्यक खत उपलब्धतेची माहिती वेळेत मिळू शकेल.

शेतकऱ्यांनी एफएफएस ॲपवर खताची नोंदणी केल्यानंतर ७२ तासांच्या आत संबंधित खताची उचल करणे बंधनकारक आहे. त्यामुळे नोंदणी करताना खताची प्रत्यक्ष गरज, आवश्यक प्रमाण आणि खरेदीसाठी उपलब्ध असलेला वेळ यांचा विचार करावा. तसेच ॲपचा वापर करताना आधारशी संलग्न मोबाईल क्रमांकावर येणाऱ्या एकवेळच्या संकेतांकाद्वारे (ओटीपी) पडताळणी केली जाते. यासाठी शेतकऱ्यांनी आपले आधार कार्ड व त्यास संलग्न मोबाईल क्रमांक अद्ययावत ठेवावेत.

एफएफएस ॲपचा वापर करताना शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी तालुकास्तरावर व्यवस्था करण्यात आली आहे. गावपातळीवर क्षेत्रीय सहाय्यक कृषी अधिकारी व संबंधित उपकृषी अधिकारी यांच्यामार्फत शेतकऱ्यांना ॲप हाताळण्याचे प्रशिक्षण आणि मार्गदर्शन दिले जात आहे. शेतकऱ्यांनी पारंपरिक पद्धतीऐवजी ऑनलाइन नोंदणी सुविधेचा अधिकाधिक वापर करावा. या सुविधेमुळे खत वितरण अधिक सुलभ व पारदर्शक होण्यास मदत होईल, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी द. रा. कळसाईत यांनी केले आहे.

# प्रतिभा निकेतन महाविद्यालयात भरड धान्य पाककृती कार्यशाळा उत्साहात संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड येथील महिला समितीच्या वतीने भरड धान्य पाककृती एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत भरड धान्यांपासून विविध पौष्टिक व रुचकर पदार्थ तयार करण्याचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. या कार्यशाळेत भरड धान्यांचे पीक, त्यासाठी लागणारी जमीन, हवामान, पाणी तसेच भरड धान्यातील पौष्टिक तत्त्वे, आरोग्यविषयक महत्त्व आणि आहारातील उपयुक्तता यांविषयी शास्त्रीय माहिती देण्यात आली.



कार्यशाळेत प्रा. डॉ. सौ. मेघा पाठक यांनी भगरीचा पुलाव, प्रा. डॉ. सौ. ममता देशमुख यांनी राळ्याचा गोड भात, प्रा. डॉ. सौ. अश्विनी देशमुख यांनी नाचणीचे चिल्ले, प्रा. डॉ. मिनाज यांनी मिश्र भरड धान्याची बिस्किटे, प्रा. डॉ. सौ. सपना पाटील यांनी ज्वारीच्या पिठाचे नूडल्स, डॉ. मीना पारिक यांनी ज्वारीचा मसाला पराठा तर डॉ. सौ. वैशाली गोस्वामी यांनी उकडलेल्या राजगिऱ्याची खीर तयार करून दाखवली. प्रत्येक पाककृतीसोबत संबंधित भरड धान्यातील पौष्टिक घटक आणि त्यांचे आरोग्यविषयक महत्त्व यांची शास्त्रीय माहितीही देण्यात आली.

कार्यशाळेच्या प्रमुख अतिथी डॉ. सौ. कांचनमाला बाहेती आणि श्रीमती छाया सौंदनकर यांनी भरड धान्यांचे आहारातील महत्त्व, आरोग्यदायी जीवनशैली आणि पौष्टिक आहाराच्या सवयी यांविषयी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कु. दीपिका ढगे यांनी केले, तर सूत्रसंचालन कु. नेहा निलेवार यांनी केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किशोर गंगाखेडकर होते. त्यांनी अध्यक्षीय समारोप करताना अशा उपक्रमांमधून आरोग्यदायी आहाराविषयी जागरूकता निर्माण होण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. स्वाती तांडे, डॉ. संगीता भुसारे, डॉ. ममता मालवीय व वर्षा रासे यांनी सहकार्य केले. डॉ. जयश्री देशमुख यांनी उपस्थितांचे आभार मानले.

या कार्यशाळेमुळे भरड धान्यांचे पोषणमूल्य, त्यांचा पाककृतींमधील वैविध्यपूर्ण वापर आणि दैनंदिन आहारातील त्यांचे महत्त्व यांविषयी उपयुक्त माहिती मिळाली. पौष्टिक आहाराचा प्रसार आणि भरड धान्यांविषयी जनजागृती करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.

# नांदेड–उधना विशेष रेल्वेगाड्यांच्या ८ फेऱ्या रद्द

**नांदेड (प्रतिनिधी)–** हजूर साहिब नांदेड ते उधना (सुरत) दरम्यान धावणाऱ्या विशेष रेल्वेगाड्यांना प्रवाशांचा कमी प्रतिसाद मिळत असल्याने दक्षिण मध्य रेल्वेने या गाड्यांच्या उर्वरित फेऱ्या रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागामार्फत प्रसिद्धी पत्रकाद्वारे ही माहिती देण्यात आली आहे.

गाडी क्र. ०७६०५ – हजूर साहिब नांदेड ते उधना या गाडीच्या २ नोव्हेंबर ते २३ नोव्हेंबर २०२६ दरम्यानच्या एकूण ४ फेऱ्या रद्द करण्यात आल्या आहेत. गाडी क्र. ०७६०६–उधना ते हजूर साहिब या गाडीच्या ३ नोव्हेंबर ते २४ नोव्हेंबर २०२६ दरम्यानच्या एकूण ४ फेऱ्या रद्द करण्यात आल्या आहेत.

अशा एकूण ८ फेऱ्या रद्द करण्यात आल्या असून, प्रवाशांनी याची नोंद घेऊन आपल्या प्रवासाचे नियोजन करावे, असे आवाहन दक्षिण मध्य रेल्वे, नांदेड विभागाने केले आहे.

# किनवट ते माहूर पदयात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## टाळ–मृदंगाच्या गजरात शेकडो भाविकांचा सहभाग; धार्मिक एकात्मतेचा संदेश



**किनवट (प्रतिनिधी)–** धार्मिक एकात्मता, सामाजिक सलोखा आणि सामूहिक श्रद्धेचा संदेश देण्यासाठी जय श्रीराम पदयात्रा समिती, किनवटच्या वतीने आयोजित किनवट ते माहूर पदयात्रेला मंगळवारी (दि. २७) पहाटे उत्साहात प्रारंभ झाला. मागील पाच वर्षांपासून ही पदयात्रा नियमितपणे आयोजित केली जात आहे.

किनवट येथील श्री संत गजानन महाराज मंदिरात पूजा, आरतीनंतर पहाटे ५ वाजता पदयात्रेला सुरुवात झाली. शहरातील शिवाजी चौकात ध्वजारोहण व छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केल्यानंतर पदयात्रा घोटी, राजगड आणि वानोळा मार्गे माहूरकडे रवाना झाली. माहूर येथील श्री दत्त शिखर संस्थान येथे पदयात्रेची सांगता झाली.

ह.भ.प. स. भ. दिनेशगुरू कुलकर्णी संभाजीनगरकर यांच्या मार्गदर्शनाखाली निघालेल्या या पदयात्रेत शेकडो महिला व पुरुष भाविक सहभागी झाले. टाळ–मृदंगाचा गजर आणि ‘जय श्रीराम’, रेणुकामाताकी जय ‘गुरुदेव दत्त’च्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला.

# नांदेडमध्ये ‘जय भीम झेन जी’ टाऊनहॉल

## ३१ ऑक्टोबरला सुजात आंबेडकर साधणार तरुणांशी संवाद

**नांदेड (प्रतिनिधी)–** वंचित बहुजन आघाडीच्या वतीने एसी, एसटी, ओबीसी समूहातील तरुणांसाठी ‘जय भीम Gen Z’ या विशेष टाऊनहॉल कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम गुरुवार, दि. ३१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता शंकरराव चव्हाण सभागृह येथे पार पडणार असून, या कार्यक्रमात वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर हे तरुणांशी थेट संवाद साधणार आहेत.

बहुजन तरुणांच्या प्रश्नांना, शैक्षणिक संधी, रोजगार आणि सामाजिक न्यायाच्या मुद्द्यांना वाचा फोडणारा हा एक महत्त्वाचा सामाजिक उपक्रम आहे. अलीकडच्या काळातील विद्यार्थ्यांचे प्रश्न आणि त्यांचे हक्क यावर या कार्यक्रमात सविस्तर चर्चा होणार आहे.

यापूर्वी छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे पार पडलेल्या ’जय भीम Gen Z’ टाऊनहॉलला तरुणांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. त्याच धर्तीवर नांदेडमध्येही हा कार्यक्रम होत असून, बहुजन समाजातील तरुणांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जय भीम जेन–जी वंचित बहुजन आघाडी नांदेडच्या वतीने करण्यात आले आहे.

# ग्रामीण टेक्निकल कॅम्पसमध्ये ‘झोनल आविष्कार-२०२६’ संशोधन स्पर्धेचा दिमाखदार समारोप

## सात जिल्ह्यांतील २५४ विद्यार्थ्यांचा सहभाग; विविध विद्याशाखांतील नाविन्यपूर्ण संशोधन प्रकल्पांचे सादरीकरण

**नांदेड (प्रतिनिधी)–** विद्यार्थ्यांमधील संशोधनवृत्ती, वैज्ञानिक दृष्टिकोन, चिकित्सक विचारक्षमता आणि सर्जनशीलतेला चालना देणारी ‘झोनल आविष्कार-२०२६’ संशोधन स्पर्धा ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कॅम्पस, विष्णुपुरी, नांदेड येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि. रायगड यांच्या वतीने सोलापूर–लातूर–नांदेड विभागासाठी आयोजित या स्पर्धेचे यजमानपद यंदा ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कॅम्पसला मिळाले होते. या स्पर्धेत सात जिल्ह्यांतील एकूण २५४ विद्यार्थी स्पर्धकांनी सहभाग नोंदवत आपल्या संशोधन प्रकल्पांचे सादरीकरण केले.



या स्पर्धेत मानव्यविद्या, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, वैद्यकशास्त्र व औषधनिर्माणशास्त्र, कृषी व पशुसंवर्धन, शुद्ध विज्ञान, तसेच वाणिज्य, व्यवस्थापन व कायदा अशा विविध विद्याशाखांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. दैनंदिन जीवनातील समस्यांवर विज्ञान व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण उपाय शोधण्याच्या उद्देशाने विद्यार्थ्यांनी विविध विषयांवरील संशोधन प्रकल्प सादर केले. त्यांच्या सादरीकरणातून कल्पकता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि समस्या सोडविण्याची क्षमता दिसून आली.

स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे आविष्कार स्पर्धा समन्वयक डॉ. संजय खोब्रागडे, विविध विद्याशाखांचे परीक्षक आणि सहभागी महाविद्यालयांचे संशोधन प्रतिनिधी उपस्थित होते.

पारितोषिक वितरण समारंभास श्री गुरु गोविंदसिंघजी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान संस्थेचे संचालक डॉ. मनीष कोकरे आणि नांदेड येथील शाह इंडस्ट्रीजचे संचालक व उद्योजक हर्षद शाह यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संकुल संचालक डॉ. विजय पवार होते. यावेळी प्राचार्य डॉ. प्रभुलिंग उल्लागड्डी आणि प्रा. संजय देऊळगावकर उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना हर्षद शाह आणि डॉ. मनीष कोकरे यांनी संशोधन, नाविन्यपूर्ण विचार आणि उद्योजकतेचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी केवळ ज्ञान संपादन न करता समाजोपयोगी संशोधनातून नवनवीन संकल्पना विकसित करण्यावर भर द्यावा, असे त्यांनी प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ओमप्रकाश दरक यांनी केले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी समन्वयक डॉ. निलेश आळंदकर आणि प्रा. ए. के. लोखंडे यांनी विशेष परिश्रम घेतले. सात जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि विविध संशोधन प्रकल्पांचे सादरीकरण यांमुळे ‘झोनल आविष्कार-२०२६’ ही स्पर्धा विद्यार्थ्यांमधील संशोधन, नवोपक्रम आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरली.

# राज्यस्तरीय काव्यकरंडक स्पर्धेत नांदेडचे कवी सचिन टोंगळे द्वितीय



**नांदेड (प्रतिनिधी)–** पनवेल येथे नुकत्याच पार पडलेल्या काव्य करंडक स्पर्धेत नांदेडचे कवी सचिन टोंगळे यांनी द्वितीय क्रमांक मिळविला आहे.

प्रज्ञा बहुउद्देशीय संस्था आयोजित १५ वे राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन पनवेल येथे नुकतेच पार पडले. या साहित्य संमेलनात राज्यस्तरीय काव्यसादरीकरण स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून आलेल्या ६० कवींनी सहभाग नोंदवला. अतिशय मनोरंजक व चुरशीच्या या स्पर्धेत नांदेडचे कवी सचिन टोंगळे यांनी आपल्या ‘अंतरंग’ या कवितेचे उत्तम सादरीकरण करत रसिक श्रोत्यांची दाद मिळवून परीक्षकांचीही मने जिंकली.

या स्पर्धेत त्यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. यावेळी त्यांना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

CMYK

फॅशन|संसार|सौंदर्य
सखी

# दिवाळीत फराळ बनवताय?

आतापासूनच दिवाळी सणाचा मोठा उत्साह पाहायला मिळतोय. घराघरांत फराळ बनवण्याची लगबग सुरू झाली आहे. कुटुंबातील प्रत्येकाच्या आवडीनुसार लाडू, चकली, चिवडा, करंजी, शंकरपाळी, शेवया असे अनेक खास पदार्थ तयार केले जात आहेत. त्यामुळे वर्षातील हीच वेळ असते, जेव्हा कुटुंब एकत्र येऊन दिवाळी फराळ, पारंपरिक मिठाई व चवदार पदार्थांचा आनंद घेते; तसा हा स्वादिष्ट फराळ नातेवाईक आणि शेजाऱ्यांबरोबर शेअरही केला जातो. पण, फराळ बनवणे वेळखाऊ असल्याने बरेच जण हल्ली रेडीमेड फराळ विकत घेतात. त्यामुळे वेळही कमी लागतो आणि खर्चही कमी होतो. पण, अशा फराळामुळे आरोग्यासंबंधीचे धोके वाढत आहेत. यंदा आरोग्यासंबंधीचे धोके टाळण्यासाठी आणि निरोगी दिवाळी साजरी करण्यासाठी तुम्ही फराळ बनवताना काही हेल्दी टिप्स फॉलो करा. त्यामुळे तुम्हाला दिवाळीत आरोग्याची चिंता न करता, लाडू, चकली, चिवडा, करंजी, शंकरपाळी अशा विविध पदार्थांवर बिनधास्त ताव मारता येईल...



## फॉलो करा 'या' टिप्स...

- तेलाचा वापर कमी करा : फराळातील विविध पदार्थ बनवण्यासाठी डिप फ्राइंग करताना चांगल्या दर्जाचे आणि प्रक्रिया न केलेले खाद्य तेल वापरा. यावेळी तेलाचा वापरही कमी करा. पदार्थामधील अतिरिक्त तेल शोषण्यासाठी टिश्यू पेपरचा वापर करा. सॅच्युरेटेड फॅट्स वापरताना डालडा किंवा वनस्पती तुपापेक्षा घरगुती गाईच्या दुधाचे तूप निवडा.
- तळण्याऐवजी बेक करा : फराळात शेंगदाणे आणि डाळ वापरताना ते तळण्याऐवजी भाजून घ्या. शेव आणि चकली तळण्याऐवजी बेक करावेत.
- वेगवेगळ्या प्रकारचे पीठ वापरा : शेव बनवताना बेसनाऐवजी मूग डाळीच्या पिठाचा वापर करा. सोयाबीन आणि नाचणीचे शेव बनवून बघा. लाडू, करंजी व शंकरपाळ्या बनवताना त्यात मैद्याबरोबरच गव्हाचे पीठ वापरा. ज्यामुळे मैद्याचा वापर कमी होईल.
- साहित्य बदलून पाहा : चिवड्यासारख्या पदार्थात सुके खोबरे वापरण्यापेक्षा ताजे खोबरे वापरा. फराळात साखरेऐवजी गूळ किंवा खजुराचा वापर करा.
- हलका नाश्ता करा : सकाळ किंवा संध्याकाळी खूप हलका नाश्ता करा. या दिवसांत तुमचा नेहमीचा नाश्ता कमी कॅलरी पर्यायांमध्ये बदला.
- कामाच्या ठिकाणी कमी कॅलरीजचे सेवन करा : कामच्या ठिकाणी एक ते दोन कपपर्यंत चहा किंवा कॉफीचे सेवन करा; ज्यामुळे २०० ते २५० कॅलरीज वाचवता येतील. अतिरिक्त १४५ कॅलरीज कमी करण्यासाठी दुपारच्या जेवणाबरोबर थंड पेय पिणे टाळा.
- स्टेप अप वर्कआउट्स : अतिरिक्त कॅलरी बर्न करण्यासाठी दिवाळीच्या आधी आणि नंतर तुमच्या वर्कआउट्स रूटीनमधील वेळ सतत वाढवत जा.
- फायबर आणि पाण्याने समृद्ध अन्न खा : फायबर आणि पाण्याचे प्रमाण जास्त असलेले पदार्थ सेवन करा.
- प्रमाणात खा : मित्र आणि नातेवाइकांना भेट देताना विविध पदार्थांचा आनंद घेताना प्रमाणात फराळ, मिठाई खा. कमी कॅलरीजयुक्त फराळ, मिठाई, सुका मेवा व फळे खा.
- रात्रीचे जेवण टाळा : संध्याकाळी नाश्ता केल्यानंतर रात्रीचे जेवण टाळा. कमी कॅलरीज असलेले पदार्थ खा. चपाती आणि भात न खाता, एक ग्लास ताक प्या. तुम्ही दिवसभर वेगवेगळा फराळ, मिठाई खाल्ली असेल, तर रात्रीचे जेवण घेणे शक्यतो टाळा.

# दिवाळीला भेसळयुक्त मिठाई तर खरेदी करत नाही ना?



**दिवाळीत घरोघरी मिठाई भरपूर प्रमाणात खाल्ली जाते. यावेळी लोक एकमेकांना मिठाई देखील भेट देतात. अशा परिस्थितीत बाजारात मिठाईची मागणी वाढते आणि त्यामुळे फसवणूक करणारे आणि भेसळ करणारेही सक्रिय होतात. बनावट मिठाईही बाजारात येतात. व्यापाऱ्यांकडून भेसळयुक्त व बनावट मिठाई ग्राहकांच्या माथी मारण्याचा प्रयत्न होत असतो. या मिठाईमुळे व्यक्तीच्या आरोग्यास मोठा धोका होऊ शकतो. बऱ्याचवेळा आपण खरेदी केलेली मिठाई शुद्ध असेल की नाही याबाबत काही माहिती सांगू शकत नाही. अनेकदा भेसळयुक्त मिठाई सर्रासपणे विकली जाते. अशावेळी चांगली आणि भेसळ नसलेली मिठाई निवडता यावी यासाठी काही गोष्टी लक्षात ठेवणं आवश्यक आहे. त्यामुळे दिवाळीच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात विकल्या जाणारी अशी बनावट मिठाई कशाप्रकारे ओळखता येईल, हे जाणून घेऊया...**

## भेसळ कशी होते?

माव्यापासून बनवलेल्या मिठाईत भेसळ करतात. म्हणजेच खवा हा दुधापासून तयार केला जातो. मात्र हे लोक दुधचं भेसळयुक्त बनवतात. बनावट वस्तूंपासून दूध केक तयार केला जातो. मिठाई रंगीबेरंगी दिसण्यासाठी त्यामध्ये आरोग्यास हानीकारक असे बनावट रंग मिसळले जातात. जे आरोग्यासाठी अत्यंत घातक असतात.

## बनावट मिठाई ओळखा

दुकानात मिठाई खरेदी करणार असाल तर नुसते रंग पाहून मिठाई पॅक करून घेऊ नका. सर्वप्रथम मिठाई खरी आहे की बनावट हे ओळखा. गोड खूप अन् रंगीबेरंगी वाटत असेल तर घेऊ नका. हातात घ्या आणि बघा त्याचा रंग तुमच्या हाताला लागतोय का... असं असेल तर घेऊ नका. मिठाई किंवा खवा तळहातावर घेऊन रगडा. तो जर कोरडा न होता तेलकट वास आला तर भेसळ समजावी. मिठाईचा तुकडा तोंडात टाकताच तेलकट वाटला तर त्यात भेसळ असू शकते. मिठाईचा वास घ्या, शिळी वाटत असेल तर विकत घेऊ नका. मिठाईवरचे चांदीचं अर्क लगेच निघत असेल तर समजा हे बनावट आहे.

## बनवा परफेक्ट काजू कतली



दिवाळीत घरोघरी पाहायला मिळणारी मिठाई म्हणजे काजू कतली. बरेचजण मिठाई बाहेरुन आणतात. घरी कुणी करत नाही. मात्र आज आम्ही तुम्हाला घरच्या घरी ही रेसिपी कशी करायची हे सांगणार आहोत. चला तर मग पाहुयात घरच्या घरी सोप्या पद्धतीत काजू कतली कशी करायची. त्यामुळे आता दिवाळी आणि भाऊबीजच्या दिवशी बनवा मार्केट सारखी परफेक्ट काजुकतलीची रेसिपी...

- साहित्य : १ कप काजू, १/४ कप मिल्क पावडर, ३/४ कप साखर, १/४ कप+ २ टेबलस्पून पाणी.
- कृती : काजूची बारीक पावडर करून घ्या. यानंतर बारीक चाळणीने पावडर चाळून घ्यावे. त्यामधे आता मिल्क पावडर मिसळून घ्या. आता कढईत साखर घालून त्यात साखर बुडेल इतपत पाणी घालून पाक करून घ्या. पाक दोन तारी झाल्यावर गॅस बंद करा. आता त्यामध्ये वरील मिश्रण घालून चांगले मिसळून घ्या. परत गॅस चालू करा. मिश्रणाचा गोळा होऊ लागला की गॅस बंद करा. लगेचच बटर पेपरवर हे कढईतले मिश्रण घालून पटपट लाटून घ्या. तुम्हाला आवडत असल्यास चांदीचा वर्ख लावा. यानंतर वड्या पाडून डिलिशिअस् काजू कतली सर्व्ह करा. अशाप्रकारे तुमची काजू कतली तयार आहे.

## घरीच बनवा कुरकुरीत तिखट बुंदी

दिवाळीत बुंदी अनेकांना खायला आवडते. त्यातही प्रत्येकाची बुंदी खाण्याची पद्धत वेगळी आहे. कोणाला गोड बुंदी आणि शेव खायला आवडते तर कोणाला तिखट बुंदीचा चिवडा. नुसती गोड बुंदी अनेकांना खायला आवडते तर काहींना गोड बुंदीचे बांधलेले लाडू आवडतात. बऱ्याच मंदिरामध्ये बुंदी प्रसाद म्हणून देतात तर महाराष्ट्रा ग्रामीण भागातील लग्नामध्ये बुंदी हमखास असते. काही लोकांना खारी किंवा तिखट चवीची कुरकुरीत बुंदी नुसती खायला आवडते. काही लोक तिखट बुंदी वेगळ्या चिवडा अथवा फरसाणमध्ये वापरतात. काही लोकांना बुंदीचा रायता किंवा ताकामध्ये टाकलेली बुंदी आवडते. आज आम्ही तुम्हाला तिखट बुंदी कशी तयार करायचे हे सांगणार आहोत...



- साहित्य : २ कप बेसनपीठ, मीठ, चिमूटभर खाण्याचा सोडा, खाण्याचा केशरी रंग (ऐच्छिक), हिंग, चाट मसाला, बेडगी मिरचीचे तिखट.
- कृती : दोन कप बारीक दळलेले किंवा विकतचे बेसनपीठ घ्यावे. त्यात मीठ आणि खाण्याचा केसरी रंग एक थेंब टाका. थोडे थोडे पाणी टाकून पीठ भिजवा. पीठ चांगले फेटून त्यातील सर्व गाठी काढून टाका. गोड बुंदीसाठी करतो त्याप्रमाणेच हे पीठ करून घ्यावे. एक चमचा पाणी आणि चिमूटभर बेकिंग सोडा टाकावा. मिक्स करून घ्यावा. बुंदीचे पीठ तयार आहे. बुंदी तळण्यासाठी तेल गरम करावे आणि गॅस मोठा ठेवा. तेलाचा मोठा डब्बा किंवा स्टिलचा मोठा डबा घ्या. एका हाताने मोठा झारा कढईवर धरा. झाऱ्याला डब्याचा आधार द्या. दुसऱ्या हाताने झाताने झाऱ्यामध्ये पीठ टाका. झारा हलेकच डब्यावर आपटला की बुंदी तेलात पडेल. जर गोल बुंदी पडत नसेल तर पीठ पातळ झाले आहे. थोडेसे बेसपीठ टाकून घट्ट करून घ्या. झाऱ्यातून बंदीच खाली पडत नसेल तर पीठ घट्ट झाले आहे. पीठात चमचा पाणी टाकून तोडे पातळ करा. बुंदी पडेल. मंद आचेवर बुंदी तळून घ्या. तयार बुंदीला हिंग, चाट मसाला, बेडगी मिरचीचे तिखट टाकून घ्या. चटपटीत, कुरकुरीत बुंदीत तयार आहे.



## हटक्या चवीचे शंकरपाळे

तोंडाची गुळचट झालेली चव बदलण्यासाठी, तोंडात टाकण्यासाठी काहीतरी चटपटीत पदार्थ हवा असतो. मग सतत चिवडा व चकली खाण्याऐवजी रव्यापासून बनवलेले शंकरपाळे हा एक मस्त चटपटीत पर्याय आहे. चला मग हे रव्याचे चटपटीत शंकरपाळे कसे तयार करायचे ते बघू...

- साहित्य : १ वाटी रवा, २ छोटे चमचे तेल किंवा तूप, १/२ चमचा मीठ, पाणी.
- कृती : सर्वप्रथम एक वाटी रवा घेऊन, तो मिक्सरला फिरवून घेऊन, त्याची बारीक पावडर करून घ्या. आता त्यामध्ये एक चमचा तेल आणि थोडे मीठ घालून घ्या. हे मिश्रण व्यवस्थित गोळा करून, गरज असेल त्याप्रमाणे थोडे थोडे पाणी घालून मळून घ्या. मळून घेतलेले हे मिश्रण अगदी घट्टही नको आणि अगदी सैलदेखील नको. आता शंकरपाळ्यांची कणीक १५ ते २० मिनिटांसाठी बाजूला झाकून ठेवा. थोडा वेळ झाकून ठेवलेली ही कणिक पोळपाटावर ठेवून त्याची अगदी पातळ पोळी लाटून घ्या. लाटलेल्या पोळीचे सुरीने छोट्या छोट्या चौकोनी आकारात कापून तुकडे करून घ्या किंवा तुम्हाला आवडेल त्या आकारात कापून घ्या. गॅसवर एका खोल कढईत मध्यम आचेवर तेल तापवत ठेवा. तेल कडकडीत तापल्यानंतर त्यामध्ये कापून घेतलेल्या शंकरपाळ्यांचे तुकडे एक-एक करून सोडा. या शंकरपाळ्यांना छान सोनेरी रंग येईपर्यंत तळून घ्या आणि नंतर कढईतून त्या बाहेर काढून घ्या. आता या तयार झालेल्या शंकरपाळ्यांवर थोडे लाल तिखट आणि आवडत असल्यास चाट मसाला घालून, या रव्याच्या चटपटी शंकरपाळ्यांचा आस्वाद घ्या.

## घरीच बनवा मोतीचूर लाडू

घरोघरी महिलांची फराळाची घाई सुरू आहे. एक एक पदार्थ महिला बनवत आहेत. यातच दिवाळीत घरोघरी पाहायला मिळणारी मिठाई म्हणजे मोतीचूरचे लाडू. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांना हे लाडू आवडतात. मात्र बरेचजण मिठाई बाहेरुन आणतात. घरी कुणी करत नाही. मात्र आज आम्ही तुम्हाला घरच्या घरी ही रेसिपी कशी करायची हे सांगणार आहोत. चला तर मग पाहुयात घरच्या घरी सोप्या पद्धतीत मोतीचूरचे लाडू कसे करायचे. त्यामुळे आता दिवाळी आणि भाऊबीजच्या दिवशी बनवा मार्केट सारखे परफेक्ट मोतीचूर लाडू रेसिपी...

- साहित्य : १ किलो बेसनची बुंदी, १ किलो साखर, तेल, दीड टेबलस्पून वेलची पावडर, अर्धा वाटी काजूचे तुकडे, अर्धा वाटी मगज बी, मीठ चवीपुरते.
- कृती : सर्वप्रथम बुंदी बनवून घेण्याकरता बेसन पीठ बारीक दळून आणावे आणि ते सरसरीत भिजवून घ्यावे. त्यानंतर चिमूटभर मीठ त्यात घालावे आणि बुंदी मोतीचूरची असल्यामुळे बारीक झाऱ्याने पाडून घ्यावी. आता बुंदी पाकात घालण्याकरता पाक तयार करण्याकरिता एक किलो साखर घ्यावी आणि साखर बुडेल एवढे पाणी घालावे मध्यम आचेवर उकळू द्यावे. पाक साखर विरघळेपर्यंत सतत हलवावा. साखरेचा पाक एकतारी असावा. तोपर्यंत साखर सतत हलवत राहावे. एकतारी पाक तयार झाला की गॅस बंद करावा आणि त्यात वेलची पावडर घालून घ्यावी. सोबत केशर वेलची सिरपही घालावे असल्यास. पाक थोडा थंड झाला की त्यात तयार बुंदी घालावी आणि छान हलवून घ्यावी. वर खाली करून बुंदी हलवलेली असल्यास बुंदी छान मुरते त्यानंतर बुंदी झाकून किमान अर्धा तास तरी ठेवावे. मधून मधून हलवून पाहावे नंतर लाडू वळण्यास घ्यावे. लाडू वळताना त्याला मगज बी आणि काजू लावून लाडू बांधावेत. लाडू बांधताना थोडा पाक बाजूला काढून ठेवावा. जेणेकरून पाक जास्त होऊ नये किंवा जरी पाक कमी पडला तरी तो नंतर वरून घालता येतो. जास्त पाक झाल्यास लाडू वळता येत नाही.



## बनवा जाळीदार अनारसे



दिवाळीसाठी १/२ किलो तांदुळापासून बनवा जाळीदार नी हलके अनारसे. याची तांदूळ भिजवण्यापासून तळण्यापर्यंतची सोपी रेसिपी पाहुयात...

- अनारसे साहित्य : १/२ किलो बासमती तुकडा तांदूळ, ४०० ग्रॅम गूळ, ४ टीस्पून खसखस, तळण्यासाठी तेल.
- कृती : इथे बासमती तुकडा हा तांदूळ अनारशासाठी वापरला आहे. त्यामुळे अनारशांना चव खूप छान येते. तुम्हाला हवे असेल तर तुम्ही कोणताही जाडा तांदूळ इथे अनारशासाठी वापरू शकता. प्रथम तांदूळ स्वच्छ धुऊन तीन दिवस भिजत घालणे. त्यातील पाणी रोज बदलून घेणे. चौथ्या दिवशी चाळणीवर दहा मिनिटे तांदूळ निथळत ठेवावे त्यानंतर वीस मिनिटे सुती कापडावर वाळत घालावे.थोडे ओलसर असतानाच मिक्सरमधुन बारिक वाटावे. यानंतर मैदा चाळतो त्या बारीक चाळणीने चाळून घ्यावे. तांदूळ मिक्सरमधून बारीक करून चाळणीने सारखे चाळून घ्यावा. त्यामुळे अनारशाचं बारीक पीठ तयार मिळते. एकदम थोडी कणी राहील तोपर्यंत मिक्सरमधून तांदूळ बारीक वाटून घ्यावे. अनारशाचं पीठ तयार झाल्यावर त्यामध्ये किसलेला गूळ मिक्स करून घ्यावा त्यानंतर ते मिश्रण मिक्सरमधून एकदा फिरवून घ्यावे. त्यामुळे गूळ आणि तांदळाचे पीठ व्यवस्थित मिक्स होते. आणि गोळाही व्यवस्थित मळता येतो. गोळा घट्ट मळल्यानंतर डब्यामध्ये चार ते पाच दिवस मुरण्यासाठी ठेवून द्यावे. (प्लास्टिकचा डबा वापरावा किंवा प्लास्टिकच्या पिशवीत ठेवून ती पिशवी डब्यात ठेवावी.) तळण्यासाठी आता पीठ बाहेर काढून घ्यावे. एका कढईत तेल गरम करावे. मळलेल्या गोळ्याचे आता छोटे छोटे गोळे करावे. हाताला थोडे तेल लावून गोळा हातावर थोडासा चपटा करून घ्यावा त्यानंतर एका ताटात किंवा पोळपाटावर खसखस पसरून घ्यावी त्यावर तो चपटा गोळा ठेवून बोटांना तेल लावून बोटांनी एकसारखे सरकवत त्याची पुरी बनवून घ्यावी. कढाईत तेल थोडेच घ्यावे आणि तळताना एकच अनारसा एकावेळी तळावा. तळताना पुरीची बाजू बदलू नये, नाहीतर खसखस करपेल. पुरी तेलात तळताना जास्त हलवू नये. झाऱ्याने पुरीवर तेल उडवावे त्यामुळे त्याला वरून छान जाळी पडते. मध्यम आचेवर ठेवून पुरी छान लालसर तळून घ्यावी. तळल्यावर अनारसे चाळणीत ठेवून घ्यावे आणि तेल चांगले अनारशातून नितळून घ्यावे.
- टीप : मळलेले मिश्रण (पीठ) खूप दिवस टिकून राहते. त्यामुळे तळताना जर अनारसे फेसाळले तर पीठ तसेच ठेवून काही दिवसांनी तळावे. तांदळाच्या पिठामध्ये गूळ मिक्स करताना ४०० ग्रॅम गूळ वापरला आहे. पण कधी कधी पीठ मळताना गुळ थोडा जास्तही लागू शकतो याचा अंदाज घेऊन घट्ट गोळा मळून घ्यावा. कधी कधी पीठ उष्णतेने सैलसर झाले तर पीठ फ्रिज मध्ये ठेवावे. अनारसे बनवताना थोडेसे तांदळाचे पीठ टाकून मळून अनारसे लगेच करून घ्यावेत. अनारसे व्यवस्थित होतात.

## कुरकुरीत शेव खायला आवडते?

दिवाळीच्या फराळामध्ये लाडू, चिवडा, चकली, शंकरपाळ्या, करंजी असे विविध पदार्थ असतात. प्रत्येकाचा आवडीचा पदार्थ वेगळा असतो. तुम्हाला जर कुरकरीत शेव खायला आवडत असेल तर ही रेसिपी खास तुमच्यासाठी. शेव नुसती खायला अनेकजणांना आवडतेच पण त्याचबरोबर चिवड्यासाठी अथवा शेवचे लाडू तयार करण्यासाठी शेव तयार केली जाते. शेव तयार करणे तसे सोपे काम आहे पण तिला कुरकुरीतपणा आला तर खरी मजा येते. चला तर मग आज शेव तयार करण्याची रेसिपी जाणून घेऊ या...



- साहित्य : १/४ कप पाणी, १/४ कप तेल, चवीपुरते मिठ, १/२ ते ३/४ कप बेसन (मावेल इतपत घालावे), १/४ टिस्पून हळद, १/२ टिस्पून ओव्याची पूड, तेल तळण्यासाठी.
- कृती : तेल, ओवापूड आणि पाणी एकत्र करून फेटून घ्यावे. नीट एकजीव होऊ द्या. मिश्रण चांगले पांढरे झाले पाहिजे. या मिश्रणात चवीपुरते मीठ आणि हळद घालून एकत्र करा. यामध्ये चमचा-चमचा बेसन घालून चांगले घोटावे. बऱ्यापैकी घट्टसर मिश्रण करावे. पातळ अजिबात नको, पण एकदम पिठाचा गोळाही मळू नये. सोऱ्यामध्ये बारीक शेवेची ताटली बसवावी व आतल्या बाजूने तेलाचा हात लावावा. कढईत तेल गरम करायला ठेवावे. मिश्रण सोऱ्यामध्ये गरम तेलात आतून बाहेर असे २-३ वेळा गोलाकारात शेव पाडावी. म शेव तळून घ्यावी. जास्तवेळ तळू नये, यामुळे शेवेचा रंग बदलतो. तळलेली शेव टिश्यू पेपरवर काढावी. नंतर शेव हलक्या हाताने चुरडून घ्यावी.

## पाकाशिवाय रव्याचे लाडू?

लाडू वळणे जरा किचकट काम आहे. विशेषतः पाकातले लाडू तयार करताना पाक थोडा जरी बिघडला तर लाडू कडक होतात किंवा बांधले जात नाही. म्हणूनच आम्ही बिनापाकातील रव्याचे लाडू कसे हे तुम्हाला सांगणार आहोत. तोंडात टाकताच विघळणारे हे लाडू बनवायला अतिशय सोपे आहेत. चला तर मग जाणून घेऊ या सोपी रेसिपी...

- साहित्य : बारीक रवा ५०० ग्रॅम, पिठीसाखर ४०० ग्रॅम, साजूक तूप १२५ ग्रॅम, काजू बदाम पावडर अर्धी वाटी, वेलची पावडर १ चमचा, मनुके.
- कृती : सर्वप्रथम कढई गरम करून त्यात बारीक रवा एका चांगला भाजून घ्या. त्यात साजूक तूप टाकून थोडावेळ मंद आचेवर परतून घ्या. रवा एका ताटात काढून घ्या आणि त्यात पिठी साखर, काजू बदाम पावडर, वेलची पावडर आणि मोहन तेल टाका. सर्व पदार्थ एकत्र करून घ्या आणि त्याचे लाडू वळा. लाडू वळताना एक मनुका त्यामध्ये टाकून वळा.

# भारतासह नेपाळवर ‘अर्णब’ चक्रीवादळाचे भीषण संकट, ५ जणांचा मृत्यू तर ५७ ट्रेन रद्द!

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या ‘अर्णब’ चक्रीवादळाने बुधवारी, २८ ऑक्टोबर रोजी आंध्र प्रदेश आणि यानम किनारपट्टी ओलांडली. या चक्रीवादळामुळे किनारपट्टीच्या भागांत जोरदार वारे, मुसळधार पाऊस आणि वीजपुरवठ्यातील व्यत्यय अशा समस्या निर्माण झाल्या आहेत. भारतीय हवामान विभागाच्या माहितीनुसार, किनारपट्टी ओलांडताना वाऱ्यांचा वेग ताशी १२५ ते १३५ किलोमीटर होता, तर झोतांचा वेग ताशी १५० किलोमीटरपर्यंत पोहोचला. जमिनीवर आल्यानंतर वादळाची तीव्रता कमी होण्यास सुरुवात झाली आहे.



वादळामुळे अनेक भागांत झाडे उन्मळून पडली, विजेचे खांब पडले आणि रस्त्यांचे नुकसान झाले. काही ठिकाणी वीजपुरवठाही खंडित झाला. सुरुवातीला आंध्र प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी जीवितहानी झाल्याची नोंद नसल्याचे सांगितले होते. मात्र, बुधवारी दुपारी प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार, वीजेच्या तारांशी संपर्क आल्याने दोन जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली. त्यामुळे मृतांची संख्या आणि परिस्थितीबाबतचे आकडे अधिकृत अपडेटनुसार तपासणे आवश्यक आहे.

चक्रीवादळाचा संभाव्य परिणाम लक्षात घेऊन दक्षिण कोस्ट रेल्वेने प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी ५७ रेल्वेगाड्या रद्द केल्या आणि १५ गाड्यांच्या वेळापत्रकात बदल केला. हवामानामुळे रेल्वे वाहतुकीवर परिणाम झाल्याने प्रवाशांनी प्रवासापूर्वी आपल्या गाडीची सद्यस्थिती तपासण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

‘अर्णब’ चक्रीवादळाच्या अप्रत्यक्ष प्रभावामुळे नेपाळमध्येही हवामान बिघडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. नेपाळच्या राष्ट्रीय आपत्ती जोखीम न्यूनीकरण आणि व्यवस्थापन प्राधिकरणाने २९ ते ३१ ऑक्टोबरदरम्यान सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. कोशी, मधेश, बागमती, गंडकी आणि लुंबिनी या प्रांतांमध्ये अनेक ठिकाणी मध्यम स्वरूपाचा पाऊस, तर काही भागांत मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. कर्नाली आणि सुदूरपश्चिमच्या काही भागांतही पावसाचा अंदाज आहे. उंच डोंगराळ आणि हिमालयीन प्रदेशांत जोरदार हिमवृष्टी, हिमवादळे आणि हिमस्खलनाचा धोका व्यक्त करण्यात आला आहे.

आंध्र प्रदेशात वादळाचा प्रभाव कमी होत असला, तरी जोरदार वारे आणि पावसाचा धोका पूर्णपणे टळलेला नाही. नेपाळमध्येही हवामानाच्या अंदाजानुसार खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नागरिकांनी अधिकृत हवामान सूचना नियमित तपासाव्यात, पूरप्रवण भागांपासून दूर राहावे आणि डोंगराळ भागांत अनावश्यक प्रवास टाळावा. चक्रीवादळामुळे प्रभावित भागांत मदतकार्य आणि नुकसानग्रस्त पायाभूत सुविधांच्या दुरुस्तीवर प्रशासनाचे लक्ष आहे.

# टी-२० पाठोपाठ झिम्बाब्वेला वनडे मालिकेत ‘क्लिन स्विप’

**मुंबई (प्रतिनिधी)–** भारत आणि झिम्बाब्वे यांच्यातील तिसरा वनडे सामना वडोदऱ्याच्या कोटम्बी येथे पार पडला. या सामन्यात नाणेफेकीचा कौल झिम्बाब्वेच्या बाजूने लागला. पण सामना मात्र भारताने जिंकला. या विजयासाठी भारताने झिम्बाब्वेला तीन सामन्यांच्या वनडे मालिकेत क्लिन स्विप दिला आहे. स्मृती मंधानाने पूर्णवेळ कर्णधारपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर हा पहिला वनडे मालिका विजय आहे. तिसऱ्या वनडे सामन्यात झिम्बाब्वेने प्रथम फलंदाजी करताना ३९.५ षटकात १० गडी गमवून १३१ धावा केल्या आणि विजयासाठी १३२ धावा दिल्या. विजयासाठी दिलेल्या धावांचा भारतीय महिला संघाने सहज पाठलाग केला. भारताने २ गडी गमवून १७ षटकात दिलेलं लक्ष्य गाठलं. यासह तीन समन्यांच्या वनडे मालिकेत झिम्बाब्वेला ३-० ने पराभूत केलं.




झिम्बाब्वेने विजयासाठी दिलेल्या १३२ धावांचा पाठलाग करताना भारताची सुरूवात काही खास झाली नाही. सलामीला आलेली यास्तिका भाटीया पहिल्याच चेंडूवर बाद झाली. त्यानंतर प्रतिका रावल आणि हरलीन देओल यांनी डाव सावरला. हरलीन देओल १९ चेंडूत १९ धावा करून बाद झाली. त्यानंतर प्रतिका रावल आणि शफाली वर्मा यांनी विजयी भागीदारी केली. प्रतिका रावलने ४७ चेंडूत अर्धशतक पूर्ण केलं. प्रतिका रावलने ५६ चेंडूत नाबाद ५९ धावांची खेळी केली. यात तिने ४ चौकार आणि ३ षटकार मारले. विजयासाठी ५ धावांची गरज असताना शफाली वर्माने षटकार मारला आणि अर्धशतक साजरं केलं. तिने २६ चेंडूत नाबद ५१ धावांची खेळी केली. या खेळीत तिने ६ चौकार आणि ३ षटकार मारले.

प्रथम फलंदाजी स्विकारल्यानंतर झिम्बाब्वेच्या डावाची सुरूवात काही खास झाली नाही. लॉरीन फिरीला खातंही खोलता आलं नाही. त्यानंतर चिपो मुगेरी तिरिपाने ४ आणि प्रिय बिझ्झा १ अशा धावसंख्येवर बाद झाले. तीन विकेट झटपट पडल्यानंतर मॉडेस्टर मुपाचिकवा आणि कर्णधार जोसेफिन न्कोमा यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला.

# वारंवार टोल भरण्याची कटकट संपणार! वाहनचालकांना वर्षभराच्या पासची सोय

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** देशातील राष्ट्रीय महामार्गांवर कायम प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसंबंधित महत्त्वाची बातमी आहे. येत्या १ नोव्हेंबरपासून वाहनचालकांसाठी FSTag संबंधित एक महत्त्वाचा बदल होणार आहे. १ नोव्हेंबरपासून, राष्ट्रीय महामार्ग टोल प्लाझाच्या २० किमीच्या परिसरामध्ये राहणाऱ्या खाजगी वाहन मालकांसाठी सरकार सवलतीचा वार्षिक टोल पास सुरू करण्यात येणार आहे. नवीन नियमांनुसार, राष्ट्रीय महामार्ग टोल परिसरामध्ये राहणाऱ्या पात्र खाजगी वाहन मालकांना प्रत्येक प्रवासावर स्वतंत्र टोल शुल्क भरण्याऐवजी वार्षिक शुल्क भरून स्थानिक टोल पास मिळवण्याची सुविधा मिळणार आहे.



वाहनचालकांना या पाससाठी रू.१५०० किंवा रू.३००० पर्यंत वार्षिक शुल्क भरावे लागणार आहे. टोल नाका महानगरपालिका किंवा स्थानिक शहराच्या हद्दीत आहे की बाहेर, यावर ही किंमत अवलंबून असेल. घरी, कामावर किंवा दैनंदिन गरजांसाठी वारंवार तोच टोल प्लाझा ओलांडणाऱ्या स्थानिक वाहनचालकांना दिलासा देणं, हा या मागचा मुख्य उद्देश आहे. ही सुविधा सर्व वाहनांना उपलब्ध नसेल. फास्टॅगची स्थिती आणि रस्त्यासंबंधित असलेल्या विशिष्ट अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे, त्यांनाच ही सुविधा उपलब्ध असणार आहे. सरकारने नवीन स्थानिक टोल पासधारकांसाठी, वाहन मालकाच्या गावाच्या किंवा शहराच्या नावावर नव्हे, तर टोल प्लाझाच्या प्रशासकीय हद्दीनुसार दोन वेगवेगळे वार्षिक शुल्क निश्चित केले आहेत.

नगरपालिका किंवा स्थानिक शहराच्या हद्दीबाहेर असलेल्या टोल नाक्यावर रू.१५०० ची योजना लागू आहे. जवळपासच्या टोल नाक्यावरून तुम्ही वार्षिक पास काढू शकणार आहेत. यासाठी दरमहा सरासरी रू.१२५ खर्च येईल. तर, महानगरपालिका किंवा स्थानिक शहराच्या हद्दीतील टोल नाक्यावर रू.३००० ची योजना लागू आहे. जवळपासच्या टोल नाक्यावरून तुम्ही वार्षिक पास काढू शकणार आहेत. सरासरी शुल्क प्रति महिना रू.२५० आहे. दोन्ही शुल्क एक वर्षासाठी लागू आहेत. एकदा संबंधित टोल नाक्यासाठी हा पास जारी झाला. तर, तो इतर कोणत्याही टोल नाक्यावर तुम्हाला तो वापरता येणार नाही. दरम्यान, सध्या, पात्र व्यक्ती रू.३६० चा मासिक पास खरेदी करू शकत आहे, ज्याची वार्षिक किंमत रू.४,३२० आहे.

**पान १ वरून...**

**फुले मार्केटचे फुटपाथ...**

अधिकार वाहतूक पोलिसांना आहे. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१, कलम ३३(बी) अन्वये धोका व अडथळा करणाऱ्या वाहनांवर निर्बंध घालण्याचा अधिकार पोलिसांना आहे. भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम २८५ अन्वये स्वतःच्या ताब्यातील मालमत्तेची योग्य व्यवस्था न केल्याने सार्वजनिक रस्त्यात अडथळा निर्माण करणारा व्यक्ती अपराधी आहे. मॉलकडे पार्किंग नसल्याने त्यांच्या ग्राहकांमुळे रस्ता अडला आहे व मॉलधारक उपाय करत नाहीत, म्हणून ते या कलमान्वये जबाबदार आहेत. सदर मॉलधारकांनी नियमानुसार स्वतःची पार्किंग व्यवस्था करावी किंवा जवळपासच्या मोकळ्या जागेचा करार करून ग्राहकांसाठी पार्किंग उपलब्ध करून द्यावी. फुटपाथवरील वाहने तत्काळ हटवावीत व त्यांच्यावर दररोज दंड व टोईंगची कारवाई करावी. चारही मॉलधारकांना पार्किंगची व्यवस्था करण्याबाबत लेखी कळवावे. फुटपाथ हे चालण्याचे ठिकाण आहे, गाड्या लावण्याचे नाही. आमचा प्रामाणिक हेतू आहे की सर्वसामान्य जनतेला त्रास होऊ नये, असे निवेदनकर्त्यांनी म्हटले आहे. या निवेदनाच्या प्रती विशेष पोलीस महानिरीक्षक, पोलीस अधीक्षक आणि उपविभागीय अधिकारी, नांदेड यांना देण्यात आल्या असून, यावर आता काय कारवाई होते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**गुरुद्वारा बोर्ड पूर्ववत....**

(क्र. १०५५३/२०२२) सुनावणी करताना मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने दि. ६ ऑक्टोबर २०२५ रोजी ऐतिहासिक निर्णय दिला. न्यायालयाने २९ जून २०२२ ची सरकारी अधिसूचना रद्द करत राज्य सरकारला मंडळाला त्याच्या मूळ स्थितीत पुनर्स्थापित करण्याचे निर्देश दिले होते.

उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, ८ मार्च २०१९ रोजी गठीत झालेल्या मंडळाला महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे उपसचिव भगवान सावंत यांच्या स्वाक्षरीने जारी केलेल्या अधिसूचना क्र. आरएफडी २८०५३(५३)/२/२०२६/जे ७ (ए) नुसार पुनर्स्थापित करण्यात आले आहे.

या अधिसूचनेच्या अंमलबजावणीमुळे गुरुद्वारा मंडळाचा दर्जा २९ जून २०२२ पूर्वी जसा होता तसाच पुनर्गठीत झाला आहे. त्यामुळे आता रीतसर गठीत मंडळाद्वारे तख्त सचखंड श्री हजूर अबचलनगर साहिब गुरुद्वाराचे व्यवस्थापन आणि प्रशासकीय कार्ये पुन्हा सुरू करणे शक्य होणार आहे.

**दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर...**

घेऊन आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. या आदेशांची अंमलबजावणी होते की नाही, हे तपासण्यासाठी विस्तार अधिकारी (पंचायत) यांच्यामार्फत गावोगावी आकस्मिक तपासणी करण्यात येणार आहे. तसेच या कामाचा साप्ताहिक आढावा घेतला जाणार असून, सर्व तालुक्यांतील ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या भेटीचे वेळापत्रक १९ ऑक्टोबरपर्यंत जिल्हा परिषद कार्यालयास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

दुष्काळी परिस्थितीत नागरिकांना पिण्याचे पाणी, रोजगार आणि जनावरांच्या चाऱ्यासह आवश्यक सुविधा वेळेत उपलब्ध व्हाव्यात, यासाठी ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी मुख्यालयी उपस्थित राहून जबाबदारीने काम करावे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम, १९६७ मधील तरतुदींनुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.


## जाहीर प्रगटन

दिनांक: २८/ १०/ २०२६

माझे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व अधिकारान्वये सर्व जनतेस व संबंधितास सदर जाहीर प्रगटणाद्वारे सुचविण्यात/ कळविण्यात येते की, माझे पक्षकार यांनी श्री. राहुल पि. प्रकाश कल्याणकर (देशमुख), रा. तरोडा (बु.) नांदेड यांच्या मालकी व ताब्यातील नांदेड म.न.पा. हद्दीतील मौजे तरोडा (खु.) नांदेड, ता. जि. नांदेड येथील जमीन गट क्र. २०५ मधील प्लॉट क्र.६ अकृषीक झालेला असून, ज्याचे क्षेत्रफळ रुंदी द.-उ.- १४ मी., लांबी पू.-प.- १८ मी. ज्याचे एकूण क्षेत्रफळ २५२ चौ. मी. आहे असून ज्याची एकत्रित चतु:सीमा:

पूर्वेस : प्लॉट क्र.३ आहे | पश्चिमेस : ७.५ मी. रुंदीचा रोड आहे

दक्षिणेस : प्लॉट क्र.५ आहे | उत्तरेस : प्लॉट क्र.७ आहे.

वरीलप्रमाणे चतु:सीमेच्या आतील प्लॉट लिहून देणार यांनी माझे पक्षकार यांना कायमचे विक्री करण्याबाबत लेखी करारनामा करून दिलेला आहे. त्याप्रमाणे माझे पक्षकार यांनी काही रक्कम बयाना पोटी लिहून देणार यांना दिली आहे व उर्वरित रक्कम सर्व कायदेशीर कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर सदरील प्लॉटच्या मालकी हक्काचे खरेदीखत करते वेळेस करून देण्याचे ठरले आहे व नोंदणीकृत खरेदीखत करण्यात येईल.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबंधितास कळविण्यात येते की, आपणास आपले आक्षेप, कब्जा, उजर, हरकती किंवा हक्क दावा संबंध, कर्ज, बोजा, गहाणखत व इतर अधिकार असल्यास त्यांनी आपला आक्षेप वा उजर संबंधित कागदपत्र व पुराव्यासकट हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसाच्या आत सादर करावे. मुदतीत आक्षेप, उजर, हरकत न आल्यास मुदतीनंतर आलेला आक्षेप, उजर, हरकत माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही. करिता हे जाहीर प्रगटन.

मार्फत

ॲड.महेश ल. भुसे ,रा. घर क्र. १०४, विजयनगर, नांदेड. मो. क्र. ९४२२१८८१७९ .

## चौकशीची जाहीर नोटीस

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालय, नांदेड विभाग, नांदेड.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९

अर्ज क्रमांक/चौकशी क्रमांक :- १६२४/२०२६

सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक –स्व.निर्मला दिगांबरराव कुलकर्णी डोंगरगावकर ट्रस्ट,यशवंतनगर, ता.जि.नांदेड

अर्जदार – श्री.हनमंत दिगांबरराव डोंगरगावकर

सर्व संबंधीत लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त नांदेड, हे वर नमुद केलेला अर्ज या संबंधी सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुदयांवर चौकशी करणार आहेत:-

१.वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?

२.खालील निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

जंगम मालमत्ता:- रोखरक्कमरु.२१०००/-रू.

सदर चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा द्यावयाचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासुन तीस दिवसांचे आत कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफयतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजुन चौकशी पुर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त, नांदेड यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०१/१०/२०२६ रोजी दिली.

अधिक्षक (न्याय)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नांदेड विभाग नांदेड

## टी.सी. हरवली

माझी रितेश नाईक तुकाराम आडे या नावाची एम.एस.डब्ल्यू. ची टी.सी. श्रीनगर ते भाग्यनगर ऑटो प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**संपर्क पत्ता –रितेश नाईक तुकाराम आडे**
**रा. पवन नगर, तरोडा (खु.) नांदेड**

## पावतीबुक हरवली

आमचे गौण खनीज वाहतूक परवानाचे काही पुस्तक व पावत्या अण्णाभाऊ साठे चौक ते नविन मोंढा प्रवासात हरवले आहे. ज्याचे गौण खनीज परवाना मंजूर क्र. KRA-2020/MASHAKA-2/GAUKHA/T-2/PRA.KRA.86 Dt. 14.03.2022 आमच्या १५५५ ब्रासच्या पावत्या हरवल्या आहेत. कोणाला सापडल्यास खालील मोबाईल नंबरवर संपर्क साधावा.

**संपर्क मोबाईल – ९४२२८७१६५०**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रॅडन, लॅबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

## टी.सी. हरवली

माझी अवधुत गोविंद भोंग या नावाची दहावी पासची टी. सी. काकांडी ते नांदेड प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**संपर्क मोबाईल**
**अवधुत गोविंद भोंग**
**रा. शंभरगाव ता. लोहा**
**जि. नांदेड**
**मो.नं. ९५२९५५४२५७**

## टी.सी. हरवली

माझी पाटील हाजप्पा मलप्पा या नावाची अकरावी पासची टी.सी. राज कॉर्नर ते कलामंदिर ऑटो प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**संपर्क मोबाईल**
**पाटील हाजप्पा मलप्पा**
**रा. मु.पो. आरळी ता.**
**बिलोली जि. नांदेड**
**मो.नं. ९५११६४४१२५**

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व संबंधितांना या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार नामे धुरपतबाई उर्फ सुंदरबाई भ्र. म्हैसाजी पवार, रा. आमदूरा, ता. मुदखेड, जि. नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारा वरून खालील प्रमाणे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

मौजे पुयनी, ता. जि.नांदेड येथील सर्व्हे नं. ५८/१, ज्याचा गट क्र. ३०४ क्षेत्रफळ १७एकर, २-आर आणि सर्व्हे नं. ७४/ब ज्याचा गट क्र.७४ एकुण क्षेत्रफळ १-एकर, २०-आर येथील जमीनी माझ्या पक्षकाराच्या वडीलोपार्जीत असून सदर जमीनीमध्ये अद्याप पर्यंत वाटणी झालेली नाही, त्यामूळे वरील जमीनीमध्ये माझ्या पक्षकारास त्यांचा हिस्सा वाटून मिळावा म्हणून माझ्या पक्षकाराने सन्माननीय दिवाणी न्यायालय कनिष्ट स्तर नांदेड येथे नियमीत दिवाणी दावा क्र. ५००/२०११ दाखल केला होता. सदर दावा दिनांक ०८-०५-२०२४ रोजी निकाली काढण्यात आला असून, सदर निकालाच्या विरूध्द माझ्या पक्षकाराने जिल्हा न्यायालयात उशीर माफीच्या अर्जासह अपील दाखल केलेले असून त्याचा क्रमांक किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ३८२/२०२४ असा असून सद्या वरील प्रकरण जिल्हा न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे. म्हणून नियमीत दिवाणी दावा क्र. ५००/२०११ मधील निकाल व हुकूमनाम्याच्या विरूध्द जिल्हा न्यायालयात दाखल केलेले प्रकरण निकाली लागे पर्यंत वर नमुद जमीनीबाबत कोणीही खरेदीचा तसेच सदर जमीन गहाण ठेवून घेण्याचा व्यवहार गोविंद पि. भुजाजी पावडे, द्वारकाबाई भ्र. माधवराव पावडे, दत्ता पि. गोविंद पावडे व गोदावरीबाई भ्र. रामचंद्र पावडे सर्व रा. पुयनी, ता. जि. नांदेड यांच्या सोबत खरेदीचा किंवा इतर कोणताही व्यवहार करू नये. वर नमूद मालमत्तेसंबंधी माझ्या पक्षकाराच्या संमतीशीवाय वरील व्यक्तीशी कोनताही व्यवहार केल्यास सदर व्यवहार बेकायदेशीर असेल व तो व्यवहार माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही, करीता सर्व जनतेस माहीतीस्तव प्रस्तूतचे जाहीर प्रगटण देण्यात येत आहे. दिनांक ३) ३१-०८-२०२५.

**जाहीर प्रगटन देणार**
**ॲड. आर. डी. जाधव जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड**
**मो.७५८८५२६४४५, ९२५२४५४५५०**

## Change In Name

I, RAJJAK KURESHI S/o SHAIKH WAJIR, R/o H.No. 280/1098. Navi Abadi Burud Galli Tq. Biloli Dist Nanded, State Maharashtra Pin Code 431710, My Father name is SHAIKH WAJIR for all future Purposes.

## Change In Name

My Old Name is **MOHAMMED SHAHNAWAZ MOHAMMAD NAZEER** which now I am Changing as New Name **MOHAMMED SHAHANAWAZ** Hence forth my all correspondence will be done as per my New Name Please consider the same.

Address - H.NO.9-5-1129 Pakiza Nagar, Degloor Naka, Near Idgah Itwara, Nanded, 431604 Cell no:8421360268

## Change In Name

My old Name is **RIZWAN KHAN MUNAWWAR KHAN** Which now I am Changing as New Name **RIZWAN KHAN MUNWAR KHAN** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

Address: 1-21-728 DARVESH NAGAR JAINODDIN KIRANA, MAHARANA PRATAP CHOWK, Nanded, 431605, Maharashtra Mob. No.7218209589

## Change In Name

My old Name is **RAISA BEGUM WAHAB ANSARI** Which now I am Changing as New Name **RAISA WAHAB ANSARI** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

Address: H. N. 1-13-284, GALLI No.9, PEER BURHAN NAGAR, TARODA BK. NANDED PIN-431605 Mob-9422548063

## Change In Name

My (old name) is **SABAHAT FIRDOSE ABDUL RAZZAK** which now I am changing as (new name) **SABAHAT FIRDOSE MOHD ASHRAF HUSSAIN.** Hence, forth my all correspondance will be done as per my new name please consider the same

Address :- H. NO. B/74 SHOBHA NAGAR OPP. NALANDA SCHOOL TARODA BK, NANDED PIN: 431605, MAHARASHTRA

## Change In Name

My old name is **GAJANAND MOTIRAM PATANE** which I am changing as New name **GAJANAN MOTIRAM PATANE**. Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the same.

Cantact - GAJANAN MOTIRAM PATANE
House No. 115, Khurgaon Nanded 431605
Cell: 9272169710.

## Change In Name

My old Name is **Sayyad Yehjaj Sayyad Rahim** Which now I am Changing as New Name **Aijaz Rahim Sayed** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

Address: Pansare Nagar Naigaon
Tq. Naigaon Dist. Nanded 431709
Mob. 9156763333

## रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



## पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# दुष्काळी अग्रीम मदतीतून बँकांना कर्जवसुली करता येणार नाही

## जिल्हा प्रशासनाचे बँकांना निर्देश



**नांदेड (प्रतिनिधी)–** सन २०२६ च्या खरीप हंगामातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या निर्णयानुसार पात्र शेतकऱ्यांना प्रत्येकी ५ हजार रुपये अग्रीम मदत देण्यात येणार आहे. नांदेड जिल्ह्यातील सर्व १६ तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यात आल्याने जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर ही मदत जमा करण्यात येणार आहे. या अग्रीम मदत रकमेतून बँकांनी कोणत्याही प्रकारच्या कर्जाची अथवा तत्सम स्वरूपाची वसुली किंवा कपात करू नये, असे निर्देश जिल्हा प्रशासनाने दिले आहेत.

दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळावा आणि त्यांना शेती व कुटुंबाच्या गरजा भागविण्यासाठी मदत व्हावी, या उद्देशाने शासनाकडून अग्रीम अनुदान देण्यात येत आहे. या मदतीचा संपूर्ण लाभ पात्र शेतकऱ्यांना मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे शासनाच्या निर्देशांचे काटेकोर पालन करून बँकांनी शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणाऱ्या अग्रीम मदत रकमेतून कोणत्याही प्रकारची कर्जवसुली अथवा अन्य कपात करू नये, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

जिल्ह्यातील सर्व बँकांनी या निर्देशांची गंभीरतेने दखल घेऊन त्याची अंमलबजावणी करावी. दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाकडून देण्यात येणारी अग्रीम मदत कोणत्याही कपातीशिवाय पात्र शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश जिल्हा प्रशासनाने दिले आहेत.

# धाराशिव जिल्हा काँग्रेसच्या प्रभारीपदी राजेश पावडे यांची नियुक्ती



**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि खासदार रवींद्र चव्हाण यांनी राजेश पावडे यांची धाराशिव जिल्हा काँग्रेसच्या प्रभारीपदी नियुक्ती केली आहे. धाराशिव लोकसभा मतदारसंघाच्या प्रभारीपदी माजी आमदार धीरज देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

राजेश पावडे यांच्याकडे धाराशिव जिल्ह्यातील धाराशिव, उमरगा, तुळजापूर आणि परांडा या चार विधानसभा मतदारसंघांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. जिल्हा प्रभारीपदासह चार विधानसभा मतदारसंघांच्या संघटनात्मक कामकाजाची जबाबदारी त्यांच्यावर देण्यात आल्याने प्रदेश काँग्रेसने त्यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे.

राज्यात काँग्रेस संघटनेची पाळेमुळे अधिक घट्ट करणे, भाजपविरोधी राजकीय भूमिका प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविणे आणि आगामी लोकसभा व विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटना मजबूत करणे, या उद्देशाने प्रदेश काँग्रेसकडून विविध जिल्ह्यांत आणि विधानसभा मतदारसंघांत प्रभारींच्या नियुक्त्या करण्यात येत आहेत.

या पार्श्वभूमीवर राजेश पावडे यांच्याकडे धाराशिव जिल्ह्यासह चार विधानसभा मतदारसंघांची जबाबदारी देण्यात आल्याने त्यांच्या संघटनात्मक कार्यावर प्रदेश नेतृत्वाने विश्वास व्यक्त केल्याचे मानले जात आहे. आगामी काळात धाराशिव जिल्ह्यात काँग्रेस संघटनेची बांधणी, कार्यकर्त्यांशी समन्वय आणि पक्षाची राजकीय ताकद वाढविण्याची जबाबदारी त्यांच्यावर असणार आहे.

# हैदराबादच्या टोळीकडून ७.७० लाखांचा गंडा, तर उमरीत पोलिसांच्या नावाने ज्येष्ठाची लूट

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात फसवणुकीचे दोन वेगवेगळे गुन्हे दाखल झाले असून, पोलिसांनी तपास सुरू केला आहे. यात एकाला हैदराबाद येथील दोघांनी कार खरेदीच्या नावाखाली घातला साडेसात लाखाचा गंडा तर उमरीमध्ये तोतया पोलिसांनी एकाला लुटले.

पहिली घटना नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतील आहे. दि. १८ ऑक्टोबर २०२५ ते १७ मार्च २०२६ या कालावधीत फिर्यादी तसबीरसिंग हरजितसिंग हंजरा (वय ३२, रा. साईबाबा मंदिर कमान, वसरणी, नांदेड) यांच्या राहत्या घरी ही फसवणूक झाली.

आरोपी साबेर खान हुसेन (रा. किंग कॉलनी, बहादुरपुरा, हैदराबाद) आणि मोईज खान उर्फ मस्तान शेख जमील आत्तर (रा. हबीबनगर, हुमनाबाद, संतोषनगर, हैदराबाद) यांनी संगनमत करून फिर्यादीला कार खरेदी करून देतो असे सांगितले. सौदा चिठ्ठी करून ७ लाख ७० हजार रुपयांची दिशाभूल करून फसवणूक केली. या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गु.र.नं. १३९४/२०२६ कलम ३१८(४), ३१६(२), ३(५) BNS-२०२३ अन्वये गुन्हा दाखल असून, तपास पोलीस उपनिरीक्षक साळुंखे करत आहेत.

**पोलीस असल्याचे सांगून सोन्याच्या अंगठ्या लंपास – उमरी**

दुसरी घटना उमरी येथे घडली. दि. २६ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास व्ही. पी. के. पतसंस्था, नगर पालिका चौक, उमरी येथे एका अज्ञात इसमाने फिर्यादी लक्ष्मण इरबा जोगदंड (वय ७२, रा. सावरगाव, ता. उमरी) यांना स्वतः पोलीस असल्याची बतावणी केली. हातातील अंगठ्या काढून ठेवण्यास सांगून त्यांच्या हाताच्या बोटातील दोन सोन्याच्या अंगठ्या, किंमत १ लाख २० हजार ५०० रुपये घेऊन तो पसार झाला. या प्रकरणी उमरी पोलीस ठाण्यात गु.र.नं. ३१३/२०२६ कलम २०४, ३१९(२), ३(५) BNS-२०२३ अन्वये गुन्हा दाखल असून, तपास पोलीस उपनिरीक्षक कदम करत आहेत. पोलिसांनी नागरिकांना अनोळखी व्यक्तींवर विश्वास न ठेवण्याचे आणि अशी फसवणूक झाल्यास तात्काळ ११२ वर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

# काँग्रेस कमिटीच्या वतीने भोकर तहसीलवर मोर्चा

- शेतकऱ्यांना प्रतिएकरी ५० हजार रुपये मदतीची मागणी
- निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या पुतळ्यास जोडे मारून पुतळा दहन



**भोकर (प्रतिनिधी)–** भोकर तालुका काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष गोविंद पाटील बाबा गौड यांच्या नेतृत्त्वाखाली बुधवार, दि. २८ ऑक्टोबर रोजी भोकर तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने सरकारविरोधात विविध मागण्यांसाठी भोकर तहसील कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या पुतळ्यास जोडे मारून पुतळा दहन करण्यात आले. यावेळी गद्दी चोर, ओट चोर, पेपर चोर यांसारखे नारे देऊन त्यांच्या राजीनाम्याची मागणी तसेच दुष्काळग्रस्त शेतकरी, पीक विमा, जनावरांसाठी चारा व पाणी आणि पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नांवर शासनाचे लक्ष वेधण्यात आले.

लोकशाहीच्या मूल्यांचे रक्षण आणि निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेसाठी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी तत्काळ राजीनामा द्यावा, तसेच दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून दिलासा देण्यासाठी प्रतिएकरी ५०,००० रुपये तातडीची आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली.

काँग्रेस कमिटीच्यावतीने भोकर तहसीलदारांमार्फत महामहीम राज्यपाल यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

निवेदनातील मागण्या -लोकशाही मूल्यांचे रक्षण आणि निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता टिकवण्यासाठी ज्ञानेश कुमार यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, शासनाकडून मिळणारा ५,००० रुपयांचा निधी अपुरा असल्याने प्रतिएकरी ५०,००० रुपये तातडीची मदत द्यावी, पीक नुकसानीचा सामना करणाऱ्या सर्व बाधित शेतकऱ्यांना नियमानुसार पीक विम्याची १०० टक्के भरपाई मिळावी, दुष्काळग्रस्त भागात पुरेशा प्रमाणात चारा छावण्या सुरू करून जनावरांसाठी चारा व पाण्याची तातडीने व्यवस्था करावी, तीव्र पाणीटंचाई असलेल्या गावांमध्ये टँकरद्वारे किंवा अन्य पर्यायी माध्यमांतून नियमित पाणीपुरवठा सुरू करावा आदी मागण्यांचे निवेदन देण्यात आले. निवेदनावर असंख्य नागरिक, कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

यावेळी प्रा. यशपाल भिंगे प्रदेशाध्यक्ष, ओबीसी काँग्रेस कमिटी, रेखाताई चव्हाण जिल्हाध्यक्ष, महिला काँग्रेस कमिटी, विठ्ठल पावडे जिल्हाध्यक्ष नांदेड, तिरुपती पाटील कोंढेकर भोकर विधानसभा नेते, प्रा. बालाजी पाटील गाडे प्रवक्ते तथा जिल्हाध्यक्ष युवक काँग्रेस, श्रीधर पाटील चव्हाण, सचिन टाले (ओबीसी जिल्हाध्यक्ष), बाळासाहेब देशमुख आंबेगावकर, अनंतवाड गुरुजी, निळकंठ वर्षेवार, लक्ष्मण हिरे, तौसिफ इनामदार शहराध्यक्ष, ललिता कुंभार, मनोरमा अम्मा (महिला तालुकाध्यक्ष), सुरेखाबाई माळे (महिला शहराध्यक्ष), श्यामसुंदर पाटील, प्रमोद देशमुख कामणगावकर, नरेश पाटील कोंडलवार, आदिनाथ चिंताकुटे, धोंडीबा भिसे, माधव शिंदे, सतीश पाटील मातूळकर, शफी इनामदार, सम्राट हिरे, राहुल पुरी, प्रल्हाद सुंकलेकर, संदीप सुरगुलवाड, सुलोचनाबाई ढोले, अनिता साबळे, सुरेखाबाई गजभारे, बंडू पाटील, खंडेराव शेंडगे आणि लक्ष्मण डोंगरे यांच्यासह काँग्रेसच्या विविध संघटनांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते, महिला पदाधिकारी, शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शॉर्टसर्किटचा तडाखा: मुदखेडमध्ये ऊस जळून खाक; लाखो रुपयांचे नुकसान



**मुदखेड (प्रतिनिधी)–** शेतकऱ्याच्या हातातोंडाला आलेला घास हिरावून घेणाऱ्या एका दुर्दैवी घटनेत शॉर्टसर्किटमुळे उभ्या ऊसाचे पीक जळून खाक झाल्याची घटना घडली आहे.

मुदखेड हद्दीतील गट क्रमांक ३६७ मध्ये शेतकरी श्रीराम काचावार यांचे शॉर्टसर्किटमुळे ऊसाचे मोठे आर्थिक नुकसान झाले. दि. २७ ऑक्टोबर रोजी सकाळी अंदाजे सव्वा अकरा वाजताच्या सुमारास शेतातून गेलेल्या महावितरणच्या विद्युत तारांमध्ये घर्षण झाले. या घर्षणामुळे ठिणक्या पडून खाली असलेल्या उसाच्या पिकाने अचानक पेट घेतला. काही क्षणातच आगीने रौद्र रूप धारण केले आणि संपूर्ण शेतातील उसाचे पीक आगीच्या भक्ष्यस्थानी पडले.

वर्षभर काबाडकष्ट करून जीवापाड जपलेले पीक डोळ्यांसमोर जळून खाक झाल्यामुळे शेतकरी प्रवीण काचावार व त्यांचे कुटुंब हवालदिल झाले आहे. आधीच दुष्काळजन्य परिस्थिती आणि त्यात निसर्गाच्या व वीज विभागाच्या या प्रकोपाने शेतकऱ्याचे कंबरडे मोडले आहे. एका क्षणात हातातोंडाशी आलेले पीक जळून खाक झाले आहे. या बिकट परिस्थितीत शासनाने आणि महावितरण कंपनीने तातडीने पंचनामा करून योग्य ती नुकसान भरपाई द्यावी आणि या संकटातून बाहेर पडण्यासाठी मदतीचा हात पुढे करावा, असे आवाहन पीडित शेतकरी प्रविण काचावार व परिसरातील नागरिकांकडून केली जात आहे.

# दुष्काळात खा. अशोकराव चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त शेतकरी कष्टकरी महिलांना साडी-चोळीचे वाटप



**अर्धापूर (प्रतिनिधी)–** माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोकराव चव्हाण यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून अर्धापूर तालुक्यात सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. सध्याच्या दुष्काळी परिस्थितीचे भान राखत कोणतीही बॅनरबाजी व अनाठायी खर्च न करता येळेगाव सर्कलचे प्रमोद कल्याणकर पिंपळगावकर व ईश्वर पाटील कपाटे यांच्या वतीने गरजू शेतकरी व कामगार महिलांना मंगळवारी साडी-चोळीचे वाटप करण्यात आले.

चेनापूर तांडा येथील संपूर्ण गावातील शेतकरी व कामगार महिलांना साडी आणि चोळी भेट देऊन हा अनोखा उपक्रम राबवण्यात आला. दुष्काळाच्या संकटाशी दोन हात करणाऱ्या सामान्य कुटुंबांतील महिलांना थेट मदत पोहोचवून अनोख्या पद्धतीने सामाजिक बांधिलकी जपत वाढदिवस साजरा करण्याच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. या कार्यक्रमास प्रभारी गोविंदराव शिंदे नागेलीकर, तालुकाध्यक्ष बालाजीराव गव्हाणे, नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रवीण देशमुख, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, माजी उपनगराध्यक्ष राजेश्वर शेटे, शहराध्यक्ष योगेश हाळदे, सुभाषराव कल्याणकर, माजी सरपंच वसंतराव कल्याणकर, भाजयुमोचे सचिन कल्याणकर, राजाराम पवार, सोशल तालुकाध्यक्ष गुरुराज रणखांब, गोविंद गोदरे, विक्रम कपाटे, पवन कल्याणकर, प्रभू कपाटे, अशोक कपाटे आणि हज्जुसिंग कामठेकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

चेनापूर तांडा येथील सरपंच गणेशराव राठोड, बालाजी राठोड, शंकर पवार, बाबू पवार, तांडा नाईक सुभाष राठोड, जीवन राठोड, सुरेश जंगिलवाड यांच्यासह गावातील ग्रामस्थ, शेतकरी व कामगार महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# यश भिलवंडेची राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेसाठी निवड



**नायगाव (प्रतिनिधी)–** नायगाव येथील ब्लू बेल्स इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये शिक्षण घेणाऱ्या यशची १७ वर्षांखालील मुलांच्या राज्यस्तरी क्रिकेट संघात निवड झाली असून, त्याच्या या यशामुळे नरसीसह नायगाव तालुक्याच्या क्रीडाक्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील शालेय क्रीडा स्पर्धांच्या अनुषंगाने लातूर विभागीय स्तरावरून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी खेळाडूंची निवड करण्यात आली. या निवडीत यशने आपले स्थान निश्चित करून शाळेच्या क्रीडापरंपरेत मानाचा तुरा रोवला आहे. राज्यस्तरीय शालेय क्रिकेट स्पर्धा १ ते ४ नोव्हेंबरदरम्यान जळगाव येथे होणार आहे. या स्पर्धेत राज्यातील विविध विभागांतील खेळाडूंना आपले कौशल्य दाखवण्याची संधी मिळणार आहे. यशच्या निवडीमुळे त्याच्या पुढील क्रीडा वाटचालीबाबत अपेक्षा उंचावल्या आहेत.

# चंदर पाटील घोगरे यांचे निधन



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** वाघाळा, ता. जि.नांदेड येथील ज्येष्ठ नागरिक तथा सेवानिवृत्त सिडको ऑफिसचे कर्मचारी चंदर भीमराव पाटील घोगरे यांचे २७ ऑक्टोंबर रोजी सायंकाळी ६ वाजता निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दि. २८ रोजी वाघाळा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक मुलगी, सुना, नातू व नातवंडे असा परिवार आहे. भीमराव चंदर, घोगरे साहेबराव, चंदर घोगरे, अचित घोगरे यांचे ते वडील व आनंद नामदेव घोगरे यांचे आजोबा होत.

# स्वारातीम विद्यापीठात उद्या 'आविष्कार' महोत्सव




**नांदेड (प्रतिनिधी)–** महाविद्यालयीन व विद्यापीठीय विद्यार्थ्यांमधील संशोधन गुणांना प्रोत्साहन मिळावे यासाठी सुरू करण्यात आलेला 'आविष्कार संशोधन महोत्सव' दि.३० ऑक्टोबर रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील औषधनिर्माणशास्त्र संकुल (स्कूल ऑफ फार्मसी) येथे आयोजित करण्यात आला आहे.

जिल्हास्तरावर विजेते ठरलेले चार जिल्ह्यातील १६४ संशोधक विद्यार्थी विद्यापीठस्तरीय 'आविष्कार' संशोधन महोत्सवात पोस्टर व प्रोजेक्टद्वारे आपली संकल्पना सादर करणार आहेत.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन तसेच कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या संशोधन महोत्सवात मानव्यविज्ञान भाषा व ललित कला, वाणिज्य व्यवस्थापन आणि विधी, मूलभूत विज्ञान, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, वैद्यक व औषधनिर्माण, कृषी व पशुसंवर्धन या सहा विभागांमध्ये विद्यार्थी आपले संशोधन सादर करणार आहेत. भाषा वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुल हे महोत्सवाचे आयोजक आहेत.

या महोत्सवाचे उद्घाटन सकाळी १० वाजता होणार असून, सायंकाळी ४ वाजता अधिसभा सभागृहामध्ये पदवी, पदव्युत्तर आणि पदव्युत्तर पदवी या विभागातील विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत. या महोत्सवासाठी विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य, अधिष्ठाता, संवैधानिक अधिकारी व देशाच्या विविध भागातून निमंत्रित विषयतज्ज्ञ यांची सन्माननीय उपस्थिती राहणार आहे.

वैज्ञानिक जागृती घडवणारा व संशोधन प्रक्रियेला चालना देणाऱ्या आविष्कार महोत्सवातील सादरीकरण पाहण्यासाठी प्राध्यापक, शिक्षक, नागरिक, विद्यार्थी यांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन 'नवोपक्रम' चे संचालक डॉ. शैलेश वाढेर, भाषा संकुलाचे संचालक डॉ. पृथ्वीराज तौर, महोत्सवाचे संयोजक डॉ. पी. विठ्ठल आणि विद्यापीठस्तरीय समन्वयक डॉ. काशिनाथ बोगले यांनी केले आहे.

# १० वर्षांच्या निष्ठेचा सन्मान! मनपाच्या ६० कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित वेतनश्रेणीचा लाभ; आयुक्तांच्या प्रयत्नांना यश

**नांदेड (प्रतिनिधी)–** तब्बल १० वर्षांहून अधिक काळ कंत्राटी तत्त्वावर अविरत आरोग्यसेवा बजावणाऱ्या महानगरपालिकेतील ६० कर्मचाऱ्यांच्या आयुष्यात अखेर स्थैर्याची नवी पहाट उजाडली आहे. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने २७ ऑक्टोबर २०२६ रोजी घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयानुसार, १० वर्षे किंवा त्याहून अधिक सेवा पूर्ण केलेल्या पात्र कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी एक वेळची विशेष बाब म्हणून अधिसंख्य पदे निर्माण करण्यात आली आहेत.

या निर्णयामुळे महापालिकेतील राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत ६० कर्मचाऱ्यांना नियमित समकक्ष वेतनश्रेणीतील अधिसंख्य पदांवर नियुक्तीचा लाभ मिळाल्याने कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

महानगरपालिकेच्या आरोग्य विभागांतर्गत राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान आणि राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत हे कर्मचारी गेल्या दहा वर्षांहून अधिक काळ सेवा बजावत आहेत. शहरातील सर्वसामान्यांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे, माता-बाल आरोग्य, औषधोपचार, प्रयोगशाळा तपासण्या, क्षयरोग नियंत्रण तसेच विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत या कर्मचाऱ्यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे. मात्र, कंत्राटी सेवेमुळे त्यांच्या भविष्याबाबत अनिश्चितता होती. शासनाच्या नव्या निर्णयामुळे या कर्मचाऱ्यांच्या दीर्घकालीन सेवेला मान्यता मिळून सेवा संरक्षणाचा मार्ग मोकळा झाला आहे.

लाभ मिळालेल्या कर्मचाऱ्यांमध्ये वैद्यकीय अधिकारी - २, सहायक परिचारिका प्रसूतीका - ३५, परिचारिका - ५, औषधनिर्माते - ५, प्रयोगशाळा तंत्रज्ञ - ४, क्षयरोग आरोग्य परिदर्शक - ४, कार्यक्रम समन्वयक - २, शहर लेखा व्यवस्थापक - १ आणि क्षयरोग पर्यवेक्षक - १ यांचा समावेश आहे. या नियुक्तीमुळे महानगरपालिकेच्या आरोग्यसेवा व्यवस्थेलाही अधिक स्थैर्य मिळणार आहे.

या संपूर्ण प्रशासकीय प्रक्रियेत सहकार्य व मार्गदर्शन केल्याबद्दल महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, उपायुक्त अजितपाल सिंग संधू आणि वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. हनुमंत रिठे यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांचे कर्मचारी वर्गाने विशेष आभार मानले आहेत.

हा निर्णय केवळ नियुक्तीपुरता मर्यादित नसून ६० कुटुंबांच्या सुरक्षित भविष्याशी जोडलेला आहे. दीर्घकाळ कंत्राटी सेवेत काम करताना अनुभवलेल्या अनिश्चिततेनंतर मिळालेल्या या दिलास्यामुळे कर्मचाऱ्यांनी शासनाचे आभार मानत नव्या उत्साहाने नागरिकांची आरोग्यसेवा करण्याचा विश्वास व्यक्त केला आहे.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com